CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०२.०९.२०२६ | अंक नं. १३१ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹50000/- सोने खरेदीवर
₹20000/- चांदी खरेदीवर
₹5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

# बंद पथदिवे चालू करण्यासाठी कंडक्टर, वायरलाही पैसे नाहीत

## अहिल्यानगर महापालिकेची दिवाळखोरी जाहीर करावी, मुख्यमंत्री, नगरविकास मंत्र्यांकडे मागणी

नगर - शहरातील पथदिवे बंद पडलेल्या प्रभागांमध्ये ते चालू करण्यासाठी बाराशे रुपयांचा कंडक्टर आणि दोन हजार रुपयाची वायर खरेदी करण्याची सुद्धा पात्रता न राहिलेल्या अहिल्यानगर महापालिकेची आता तरी दिवाळखोरी जाहीर करावी. अशी मागणी जागरूक नागरिक मंचच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

मंचचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी याबाबत पाठविलेल्या ईमेल मध्ये म्हंटले आहे की, महानगरपालिका या शब्दाचा अर्थ असा होतो कि त्या नगरचे पालकत्व ज्या संस्थेने स्वीकारले आहे, अशी संस्था... पण ते पालकच जर स्वतः उपासमारीने मुडदूस झाले, स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी दिवाळीखोर झाले, तर त्याचे सगळे कच्चे बच्चे पाल्य बेवारस होऊन जातात तशी आपली नगरकरांची अवस्था आहे.आगरकर मळ्यामध्ये मागील आठवड्यापासून स्मृती हाऊसिंग सोसायटी, एकता कॉलनी एमएसईबी कॉलनी, स्ट्रिट लाईट अभावी पूर्ण अंधारात आहे. कारण काय आहे तर ट्रांसफार्मर वर बसवण्यासाठी कंडक्टर आणि सर्विस वायर उपलब्ध नाही. शहर आणि उपनगरी भागात बहुतांश ठिकाणी अशीच परिस्थिती असल्याचे पहावयास मिळत आहे. एक तर आपला मनपाचा विद्युत विभागच पूर्णपणे अंधारात बुडालेला आहे.. इथे कोणीही जबाबदार कर्मचारी, अधिकारी नाही. सगळं काही ठेकेदारी पद्धतीने चालू आहे. आपल्या सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा पावसाचा कहर झालेला नाही अन्यथा शहरांमध्ये सांडपाण्याची दुरावस्था प्रचंड झाली असती, कारण अनेक ठिकाणी मॅन होल, गटारीची झाकणं बसवायला सुद्धा मनपाकडे पैसे नाहीत. मनपाची वसुली नाही, पैसे नाही.कोट्यावधी रुपयांची कर थकबाकी, कोट्यावधी रुपयांचे देणे बाकी. या सगळ्याकडे नगर विकास राज्य सरकार वर्षानुवर्षे डोळे झाकी.

### आमदारांच्या समितीची बडदास्त आणि अनुकूल अहवाल

मागील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विकास कामांची पाहणी करण्यासाठी अर्धा डझन आमदारांची एक तटस्थ समिती आली होती, त्यांच्याकडून आलेला निधी आणि विकास याबाबत काही प्रतिकूल अहवाल जाऊ नये म्हणून त्यांची बडदास्त ठेवण्या मध्येच मनपा लोकप्रतिनिधी, कर्मचारी व अधिकारी दोन-तीन दिवस रात्री तीन तीन वाजेपर्यंत डाक बंगल्यावर, आणि एका खाजगी हॉटेलमध्ये त्या समितीची बडदास्त ठेवून अर्थपूर्ण सेवा करीत होते. त्यामुळे शासनाच्या अर्थसंकल्पातून मंजूर होणारा निधी आणि त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली आहे की नाही याचा अहवाल त्या समितीकडून शासनाकडे खरच कसा गेला असेल? याची आपण कल्पना करू शकतो.

आज पासून ७५ वर्षांपूर्वी १९५० मध्ये तत्कालीन अर्थमंत्री जॉन मथाई यांनी शासनाने दिलेल्या निधीचा खरंच उपयोग होतो की नाही याची तपासणी करण्यासाठी अशा प्रकारच्या अर्थसंकल्पीय समितीची उत्कृष्ट संकल्पना मांडली होती त्याला राज्यघटनेच्या अनुच्छेद २०८, २०९ आणि २१०अंतर्गत विधिमंडळाने तिचे अधिकार आणि कामकाज ठरवून दिले होते. पण आपल्या देशामध्ये प्रत्येक कायद्याला आणि तरतुदीला पळवटा शोधणारेच जास्त हुशार आहेत. शासनाच्या योजनेत, निधीमध्ये गैरव्यवहारात अडकलेले अधिकारी, लोकप्रतिनिधी बचावासाठी त्यातून सुटण्यासाठी या समितीचे जंगी आदरातिथ्य आणि बडदास्त ठेवून असे शासनाकडून आलेल्या निधी बाबत संपूर्ण योग्य विनिमय झाल्याचा आपल्याला पाहिजे तसा अहवाल तयार करून घेतात. मग परीक्षणाला आलेल्या समिती सदस्यांचाच गलेलठ्ठ विकास होतो आणि ते अवजड बॅगा घेऊन, जड अंतकरणाने निघून जातात. हे दृश्य आपण नुकतेच पाहिले आहे.

### आमदारांच्या समितीने जनतेत मिसळून आढावा घ्यावा

या समितीने एकदा सरप्राईज व्हिजिट करून आलेला निधी आणि झालेला विकास पाहण्यासाठी थेट जनतेमध्ये मिसळून सगळ्या गैर सोयी, मूलभूत सुविधांचा अभाव यांचा आढावा घ्यायला पाहिजे. म्हणजे अहिल्यानगर मनपाने दिवाळखोरी जाहीर करावी असा तरी खरा अहवाल ते शासनाला देतील आणि शासन अहिल्यानगर मनपाला मांडीवर घेऊन दत्तक तरी घेतील, आणि नगरकर लावारीस होण्यापासून वाचतील असे वाटते. कारण पावणेतीन हजार कर्मचाऱ्यांची तरतूद असलेल्या या मनपामध्ये फक्त बाराशे कर्मचारी काम करतात, कारण नवीन भरतीला परवानगी नाही. मग पाहुण्याचे मेव्हणे आणि मेव्हण्यांचे पाहुणे कंत्राटी भरती केलेले मोलाने घातले रडायला, आणि पाणी नाही डोळ्याला असे ठेकेदारी आणि धोकेदारी कागदावर प्रभारी आहेत.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आपण निवडून दिलेले नगरसेवक निवडणुकीत झालेला खर्च वसूल होण्याचे कुठलेच चिन्ह दिसत नसल्यामुळे, उदास, निष्क्रिय आणि हतबल होऊन आता टर्म पुरी होईपर्यंत जे जे होईल, ते ते मुकाट्याने पाहाणे, पक्ष म्हणे आता इथून पुढे या निवडणुकीला उभेच न रहाणे, असं दामस्मरण करत बसले आहेत.

### व्हेंटिलेटरवरील मनपाला बूस्टर डोसची गरज

अतिशय चाणक्य बुद्धिमान मुत्सद्दी असलेले आपले मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री ज्यांचे कडे नगर विकास खाते आहे, त्यांनी अहिल्यानगर मनपा.. जी शेवटचे श्वास घेत व्हेंटिलेटर वर आहे.. तिला बूस्टर डोस देऊन वाचवावे. २५० कोटी रुपये थकबाकी असलेले गले लठ्ठ थकबाकीदाराबाबत कठोर फास्टट्रॅक कोर्ट मध्ये थेट जप्तीची आणि लिलावांची कारवाई करावी, वसूल झालेल्या पैशातून नागरिकांना कर भरावा वाटेल, अशा सुविधा द्याव्यात, तंबाखू छाप ठेकेदार ब्लॅकलिस्ट करावेत, चांगलं काम केलेल्या ठेकेदारांचे देणे द्यावे, आणि प्रशासकीय खर्च नियंत्रित करून नवीन कर्मचारी भरती करावी. मुख्य म्हणजे हे सर्व करण्यासाठी एखादा प्रती तुकाराम मुंढे वाटावा, असा प्रशासक अधिकारी नेमावा.आणि हे सर्व करण्यासाठी पुढील निवडणुकीची वाट पाहू नये. तरच चित्र पालटेल. अशी नगरकरांकडून नम्र विनंती, असेही सुहास मुळे यांनी म्हंटले आहे.





डाळ मंडई भागामध्ये रस्त्यावर आडव्या गाड्या लावून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर शहर वाहतूक शाखेचे मन्सूर शेख यांनी कारवाई केली. (छाया - धनेश कटारिया)

# बाजारपेठेत बेशिस्त वाहनांवर वाहतूक शाखेची दंडात्मक कारवाई

## यापुढेही बाजारपेठेत बेशिस्त खपवून घेणार नाही : वाहतूक शाखेचा इशारा

नगर - शहरातील अत्यंत वर्दळीच्या डाळ मंडई परिसरात माल खाली करण्याच्या नावाखाली रस्त्यावर आडवी वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या दुकानदारांवर शहर वाहतूक शाखेने २ सप्टेंबर रोजी दुपारी दंडात्मक कारवाई केली. या कारवाईदरम्यान प्रशासनाला विरोध करणाऱ्या दुकानदारांना शहर वाहतूक शाखेचे मन्सूर शेख यांनी स्पष्ट शब्दात इशारा देत व्यापारी असला तरी रस्त्यावर आडवी वाहने लावून नागरिकांना त्रास देणे अजिबात खपवून घेतले जाणार नाही, असे सांगत कारवाईचा बडगा उगारला.

अहिल्यानगर येथील डाळ मंडई परिसरात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. येथील काही दुकानदार आणि वाहतूकदार दुकानांसमोर माल खाली करण्यासाठी स्वतःची वाहने सर्रास दोन ते तीन तास रस्त्यावर आडवी उभी करतात. या मनमानी कारभारामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना, वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. तसेच समोरुन दुसरे वाहन आले तर ते वाहन अडकून पडते. परिणामी वाहतूक कोंडी होऊन परिसरातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होत असल्याने नागरिकांमधून याविषयी तीव्र संताप व्यक्त होत होता.

नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत शहर वाहतूक शाखेने २ सप्टेंबर रोजी दुपारी अचानक डाळ मंडई भागात धडक देत वाहतुकीला अडथळा ठरणारी वाहने आणि दुकानदारांवर दंडात्मक कारवाई केली. कारवाईदरम्यान काही जणांनी पोलीस प्रशासनालाच विरोध दर्शवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाहतूक शाखेचे मन्सूर शेख यांनी हा विरोध मोडून काढत स्पष्ट शब्दांत सुनावले की, एक तर तुम्ही रस्त्यावर आडव्या गाड्या लावून नागरिकांना नाहक त्रास देता आणि वरून पोलीस प्रशासनालाच विरोध करता, हे अजिबात चालणार नाही. यापुढे शिस्तीचे उल्लंघन करून वाहतुकीला अडथळा निर्माण केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# आजारी वृध्दाचे अपहरण करून मालमत्ता हडपली; वकिलासह ८ जणांवर गुन्हा दाखल

नगर - आजारी वयोवृद्धाचे घरातून बळजबरीने अपहरण करून त्यांची स्थावर मालमत्ता, गाडी, दागिने आणि बँकेतील रोख रक्कम असा कोट्यवधींचा ऐवज लाटल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगरमध्ये उघडकीस आला आहे.

या प्रकरणी सुरेश गणेश चितांबर (वय ७५, सध्या रा. पुणे) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अॅटडव्होकेट तेजस्वी कुलकर्णी - तवले, मेधा महेशकुमार यादव, रंजना मारुती झिने, प्रवीण बबन बारस्कर, सचिन बबन बारस्कर, महेश गोविंद पवार, ज्ञानेश्वर रविंद्र सोनार आणि एका अज्ञात इसमावर विविध कलमान्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, सुरेश चितांबर यांच्या आजारपणाचा गैरफायदा घेत आरोपींनी संगनमत करून त्यांना राहत्या घरातून उचलून नेले. त्यानंतर त्यांची मिळकत बळकावण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात तोतया व्यक्ती उभा करून बनावट बक्षीसपत्र व साठेखत तयार केले. यावर बनावट स्वाक्षऱ्या करून खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली.

तसेच आरोपींनी चितांबर यांच्या घरातून मुलीच्या लग्नासाठी ठेवलेले सोन्याचे दागिने, चांदीची व पितळेची भांडी, बँक खात्यातील २६ लाख ८० हजार रुपयांची रोख रक्कम, एटीएम कार्ड, लॉकरच्या चाव्या आणि शेव्हरलेट कंपनीची चारचाकी गाडी चोरून नेली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

क्वॉलिटीत भारी किंमतीत कमी
पुरुषांच्या १५०० रु.पेक्षा जास्त खरेदीवर एक रिस्ट वॉच मोफत..
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रॅण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट, कुडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स, फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
2XL पर्यंत..ब्रॅण्डेड शर्ट, नाईट पॅन्ट, जीन्स रु.२०० पासून पुढे, कार्गो पॅन्ट रु.२५० लहान मुला-मुलींचे ड्रेस रु.२०० पासून पुढे
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा :
कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

९ वे पुण्यस्मरण



कै.अजय रावसाहेब बोरुडे
स्व.दि.२/९/२०१७
दु:खांकित
समस्त बोरुडे परिवार
अहिल्यानगर

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष | महिला | मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
पुरुषांसाठी | महिलांसाठी | मुलांसाठी
उपलब्ध नामांकित ब्रॅण्डस्
adidas | NIKE | PUMA | Reebok | SKECHERS | asics | campus | sparx | ABROS | Bata | RELAXO | Paragon | crocs | Hush Puppies | Lee Cooper | RED TAPE | WOODLAND | WILDCRAFT | CONVERSE | KOLHAPURI | मोजडी
१००% ओरिजनल ब्रॅण्ड्स | उत्तम क्वॉलिटी | वाजवी दर | संपूर्ण कुटुंबासाठी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## हॉटेलच्या पार्किंगमधील दुचाकीच्या डिक्कीतून रोख रकमेची चोरी; गुन्हा दाखल

नगर - शहरातील तारकपूर रस्त्यावरील एका नामांकित हॉटेलच्या पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या दुचाकीची डिक्की उचकटून अज्ञात चोराने रोख ३५ हजार रुपयांसह महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत भिकाजी दत्तू कांबळे (वय ५८, रा. स्वप्नपूर्ती अपार्टमेंट,माळीवाडा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे तारकपूर रस्त्यावरील व्ही स्टार हॉटेल येथे शेफ म्हणून काम करतात. ते कामासाठी हॉटेलवर गेले होते. त्यांनी आपली दुचाकी हॉटेलच्या पार्किंगच्या जागेत पार्क केली होती. दुचाकीच्या डिक्कीमध्ये ३५ हजार रुपयांची रोख रक्कम, ओळखपत्र, दुचाकीचा परवाना आणि वाहनाचे नोंदणी पुस्तक ठेवलेले होते.

दुपारी १२ ते सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास अज्ञात चोराने डिक्की उघडून त्यातील ३५ हजार रुपयांची रोकड आणि कागदपत्रे चोरून नेली. काही वेळाने फिर्यादी भिकाजी कांबळे वाहनाजवळ आले असता त्यांना डिकीतील साहित्य चोरीला गेल्याचे लक्षात आले. या घटनेनंतर भिकाजी दत्तू कांबळे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरोधात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक बालाजी पंधरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक सय्यद पुढील तपास करत आहेत.

## महिला व बालकल्याण समितीच्या पहिल्याच महासभेत दोन कोटी ५५ लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी



मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या महासभेत बोलताना सभापती दिपालीताई बारस्कर.

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीची पहिली महासभा सभापती दिपालीताई बारस्कर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या महासभेत शहरातील महिला व बालकांच्या विविध प्रश्नांसह आरोग्य, शिक्षण, क्रीडा, महिला बचत गट, स्वच्छतागृह, अंगणवाडी, शाळा खोल्या, योगाभवन तसेच बचत गट भवन आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार बजेटच्या ५ टक्के रक्कम म्हणजे २ कोटी ५५ लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती सभापती दिपालीताई बारस्कर यांनी दिली.

महिला व बालकल्याण समितीसाठी बजेटच्या ५ टक्के रकमेची स्वतंत्र तरतूद करून दर महिन्याला स्वतंत्र खाते निर्माण करून त्यामध्ये रक्कम जमा करावी, असा निर्णयही महासभेत घेण्यात आला. यावेळी उपसभापती वर्षा सानप, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, नगरसचिव मेहेर लहारे, उपायुक्त शाहनवाज तडवी, सदस्य पुष्पा बोरुडे, अश्विनी लोंढे, अनिता शेटीया, रोशनी त्रिंबके, रूपाली दातरंगे, शेख शहनाज, सुनिता भिंगारदिवे, मंगल लोखंडे, आशाबाई कातोरे, डॉ. दिलीप बागल आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील विविध भागांतील ओपन स्पेसमध्ये महिलांसाठी ओपन जिमचे साहित्य बसविण्यासाठी ६४ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मुलांसाठी खेळणी बसविण्यासाठी ३४ लाख रुपये मंजूर करण्यात आले. पाईपलाईन रोडलगत महापालिकेच्या मालकीच्या ओपन स्पेसमध्ये महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी वस्तू विक्री केंद्र उभारण्यासाठी २० लाख रुपये तसेच भिस्तबाग येथील जागेवर वस्तू विक्री केंद्र उभारण्यासाठीही २० लाख रुपये मंजूर करण्यात आले.

अर्धांगवायू झालेल्या महिलांसाठी बेड खरेदी करून महापालिकेच्या आरोग्य केंद्रामार्फत रुग्णांना ते विनाम ोबदला उपलब्ध करून देण्यासाठी ५ लाख रुपये तरतूद करण्यात आली. महिला बचत गटांच्या विविध वस्तूंच्या विक्री प्रदर्शनासाठी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले. तसेच अंगणवाडी केंद्र उभारण्यासाठी २० लाख रुपयांच्या विकासकामांना महासभेत मंजुरी देण्यात आली.

सभापती दिपाली बारस्कर म्हणाल्या, महिला व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महापालिकेच्या आरोग्य विभागामध्ये मानधनावर नर्स, भूलतज्ज्ञ व डॉक्टरांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच स्टेट बँक चौक व स्वस्तिक चौक परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृह तसेच पिंक ग्राउंडची निर्मिती करण्यात यावी. दिवाळी सणाच्या काळात महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना मोठी बाजारपेठ मिळावी, यासाठी वस्तू विक्री प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या शाळांमध्ये सुधारणा करण्यासाठी सात शाळांच्या खोल्यांची दुरुस्ती करण्यात येणार असून, या ठिकाणी स्वच्छतागृह व लॅबची निर्मिती केली जाणार आहे. शासनाच्या वतीने उत्कृष्ट शाळा म्हणून स्पर्धेचे आयोजन केले जाणार असून, यामध्ये पहिले पारितोषिक १० कोटी, दुसरे ७ कोटी व तिसरे ५ कोटी रुपये दिले जाणार आहे. शाळांच्या खोल्या दुरुस्तीसाठी शासनाने महापालिकेला ५ कोटी रुपयांचे अनुदान दिले असून, चांगल्या शाळा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे दिपालीताई बारस्कर यांनी सांगितले.

सभेत समितीच्या सदस्या पुष्पाताई बोरुडे, रोशनी त्रिंबके, सुनिता भिंगारदिवे, मंगल लोखंडे, अश्विनी लोंढे, अनिता शेटीया, रूपाली दातरंगे व शेख शहनाज यांनी महिला व बालकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून आवश्यक सूचना मांडल्या.



नेप्ती चौकात वाहतूक कोंडीवर उपाय शोधण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पाहणी केली.

## नेप्ती चौकातील वाहतूक कोंडीवर बॅरिकेटींगचा पर्याय

नगर - शहरातील अमरधाम जवळील नेप्ती चौकात होणाऱ्या नित्याच्या वाहतूक कोंडीवर उपाय शोधण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. शहरातील उद्योजक व आर्किटेक्ट पवन शिंदे यांच्या संकल्पनेतून नेप्ती चौकात बॅरिकेटींग करून वाहतूक सुरळीत करण्याचा नवा प्रस्ताव पुढे आला आहे. आ. जगताप यांनी या संकल्पनेला तातडीने मान्यता देत मंगळवारी सायंकाळी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली. त्यानंतर मनपाचे शहर अभियंते, वाहतूक निरीक्षक, परिसरातील नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बॅरिकेटींगच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी संग्राम जगताप म्हणाले, नेप्ती चौकातून जाणारा कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, अमरधाम तसेच ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ यामुळे या परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत असते. शहरातून जाणारी आणि बाहेरून येणारी वाहने एकाच ठिकाणी एकत्र आल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. नेप्ती चौकातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी शहराविषयी आत्मीयता असलेल्या आर्किटेक्ट पवन शिंदे यांनी पुढाकार घेत बॅरिकेटींगचा प्रयोग तात्पुरत्या स्वरूपात राबवून वाहतूक योग्य पद्धतीने वळविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रयोगाला यश मिळाले तर येथे कायमस्वरूपी दुभाजक उभारून चौकाचे सुशोभीकरणही करण्यात येईल. पवन शिंदे यांनी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेतला, त्याबद्दल अहिल्यानगरकरांच्या वतीने त्यांचे अभिनंदन व आभार मानतो. प्रत्येक नागरिकाने आपल्या नगरसाठी आपणही काहीतरी केले पाहिजे ही भावना मनात ठेवून पुढाकार घेतला, तर आपले शहर विकसित आणि सुंदर शहर म्हणून राज्यात व देशात नावलौकिक मिळवू शकते. आर्किटेक्ट पवन शिंदे यांच्याप्रमाणे प्रत्येकाने शहरासाठी काहीतरी चांगले करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहनही आ. जगताप यांनी केले.

आर्किटेक पवन शिंदे म्हणाले, नेप्ती चौकातून दररोज ये-जा करताना वाहतुकीच्या समस्येचा सामना करावा लागत असल्याने या प्रश्नावर काहीतरी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज जाणवली. याबाबत आ. संग्राम जगताप यांची भेट घेऊन चौकात बॅरिकेटींग करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यास त्यांनी तातडीने मान्यता दिली आणि आज तत्परतेने अंमलबजावणीही केली. आशा अनेक संकल्पना आहेत पण त्यासाठी कोणीतरी पुढाकार घेणे आवश्यक आहे. आ. संग्राम जगताप यांनी तत्परता दाखवल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

यावेळी वाहतून शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, नगरसेवक गणेश कवडे, सुरेश बनसोडे, विपुल शेटिया, मयूर बांगरे, शहर अभियंता मनोज पारखे, उपअभियंता श्रीकांत निंबाळकर, गोरख पडोळे, मनीष फुलडहाळे, गणेश दातरंगे, वैभव वाघ आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## इंस्टाग्रामवर बनावट अकाउंट उघडून दाम्पत्याची बदनामी

### तरुणाच्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - सोशल मीडियावर तरुणाचे व त्याच्या पत्नीचे फोटो वापरून बनावट अकाऊंट तयार करत बदनामी केल्याप्रकरणी पारनेर तालुक्यातील कुरुंद येथील तरुणाच्या फिर्यादीवरून सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुरुंद (ता. पारनेर) येथील सचिन शिवाजी पाबळे यांचे रांगडा शेतकरी या नावाचे इंस्टाग्राम अकाउंट आहे. दरम्यान, ३ मे ते ७ मे २०२६ दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या नावाचा व पत्नीच्या फोटोचा वापर करून सचिन पाबळे या नावाने एक बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार केले. त्या खात्यावर सचिन पाबळे व त्यांच्या पत्नीचा फोटो डीपीला लावून बदनामीकारक मजकूर लिहिण्यात आला होता. फिर्यादीने त्या बनावट अकाउंटवर संपर्क साधला असता, संबंधित युजरने त्यांना अयोग्य संदेश पाठवले व अपमानास्पद चॅटिंग केली. या प्रकरणी सचिन पाबळे यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला होता. पोलिसांनी तांत्रिक तपासादरम्यान सदर बनावट इंस्टाग्राम अकाउंट एका मोबाईल नंबरचा वापर करून तयार करण्यात आल्याचे निष्पन्न केले.

याप्रकरणी सचिन पाबळे यांच्या फिर्यादीवरून १ सप्टेबर रोजी सायबर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (सी) आणि भारतीय न्याय संहिता कलम ३५६ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पो. नि. सागर ढिकले करत आहेत.

## आरोग्य केंद्र वसाहतीत घरफोडी

नगर - देहरे (ता.नगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वसाहतीत राहणाऱ्या डॉक्टर निवासस्थानाचे शटर व दरवाज्याचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरफोडी केली. या घटनेत सोन्याचे दागिने, टीव्ही आणि रोकड असा ५५ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला. ही घटना ३० ऑगस्ट रोजी रात्री ११ ते ३१ ऑगस्टच्या सकाळ दरम्यान घडली. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ.शाहरूख सिद्दकी यांनी फिर्याद दिली आहे. चोरट्याने स्मार्ट टीव्ही, सोन्याचे टॉप्स, सोन्याची अंगठी व रोख चोरून नेली.

## रमेश शिंदे यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - आंबेडकर कॉलनी येथील रहिवासी रमेश (अंकल) शिंदे (वय ६५) यांचे २ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. रोहित शिंदे यांचे ते वडील होत.

## चंदादेवी उदासी यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - महात्मा कॉलनी येथील रहिवासी चंदादेवी किसनदास उदासी (वय ७८) यांचे १ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २ सप्टेंबर रोजी भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. किसनदास उदासी यांच्या त्या पत्नी तर उमेश, योगेश, नितेश यांच्या आई होत.

## शंकर भैरी यांचे दु:खद निधन



नगर - श्रमिकनगर येथील रहिवासी वैष्णव पेपर एजन्सीचे प्रोप्रा. शंकर अंबादास भैरी (वय ४२) यांचे २ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, सुना, ५ भाऊ, भावजया, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार श्रीनिवास सामल यांचे ते दाजी होत.

## चंद्रकांत पारधे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - रभाजीनगर गणेश मंदिरा शेजारी, केडगाव येथील रहिवासी चंद्रकांत नारायण पारधे (वय ५९) यांचे २८ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ ऑगस्ट रोजी केडगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, २ मुली, २ बहिणी, चुलत भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. रमेश व अशोक पारधे यांचे ते चुलत बंधू होत.

## प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर खा. नीलेश लंके यांचे उपोषण मागे

### शिक्षक पदभरती, अशैक्षणिक कामांचा भार याबाबत प्रशासनाची कार्यवाही, शासनाकडे प्रस्ताव सादर



जिल्हा परिषद प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण सोडताना खा. नीलेश लंके.

नगर - प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरणे, शिक्षकांवरील वाढता अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे आणि विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबविणे या मागण्यांसाठी खा. नीलेश लंके यांनी सुरू केलेले उपोषण १ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा मागे घेतले. माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर तसेच शासनस्तरावरील मागण्यांबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

खा. लंके यांनी १ सप्टेंबरपासून अहिल्यानगर जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. जिल्ह्यात शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दा त्यांनी आंदोलनातून उपस्थित केला होता. तसेच कार्यरत शिक्षकांवर विविध अशैक्षणिक कामांचा वाढता भार टाकला जात असल्याने अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची भूमिका त्यांनी मांडली होती.

जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या माध्यमिक शाखेने दिलेल्या लेखी माहितीनुसार, जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील रिक्त शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलमार्फत सुरू आहे. सन २०२६ मधील भरती प्रक्रियेत जिल्ह्यातील १५१ संस्थांच्या एकूण ९६३ पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात विनामुलाखत प्रक्रियेद्वारे १४ संस्थांमधील ३३१ रिक्त पदांसाठी २७० उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. उर्वरित ६१२ पदांसाठी मुलाखतीसह निवड प्रक्रिया पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यातील सुमारे १९४ संस्थांनी अद्याप पवित्र पोर्टलवर जाहिराती प्रसिद्ध केलेल्या नाहीत. तसेच ३० अल्पसंख्याक संस्थांमधील रिक्त पदे व भरती प्रक्रियेबाबत आढावा घेऊन पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येणार आहे. नियमित शिक्षकांच्या जागी अन्य शिक्षकांकडून अध्यापन करून घेतले जात आहे का, याचीही क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करण्यात येणार असून आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाने कळविले आहे.

शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनासाठीचा वेळ आणि अशैक्षणिक कामांमध्ये जाणारा वेळ याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास करण्यात येणार असून स्तंभालेखासह सविस्तर माहिती पुढील आठ दिवसांत खासदार लंके यांना देण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे. प्राथमिक शिक्षण विभागानेही खासदार लंके यांच्या निवेदनातील जिल्हा परिषद स्तरावरील मागण्यांवर कार्यवाही सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. खा. लंके यांच्या उपोषणातील शासनस्तरावरील प्रमुख मागण्यांबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे. लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आणि मागण्या शासनस्तरावर पाठविण्यात आल्याने खा. लंके यांनी रात्री उशिरा उपोषण मागे घेतले.

उपोषण स्थळी दादाभाऊ कळमकर, जिल्हाध्यक्ष सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, रामभाऊ झिने, सुशील बोर्डे, अभिजीत ससाने,प्रकाश पोटे,रघुनाथ झिने बाळासाहेब हराळ, बन्सी उबाळे, पोपटराव पुंड, नगरसेवक योगीराज गाडे, महादेवराव कोकाटे, शरद पवार, शिवा पाटील होळकर, शाम जरे, दिलीप वाळुंज अनिल जगताप आदी उपस्थित होते. जिल्हा परिषद चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, माध्यमिकचे जिल्हा उपशिक्षणाधिकारी श्रीमती संध्या भोर, प्राथमिकच्या उपशिक्षणाधिकारी श्रीमती शिवगुंडे, शालेय पोषण आहारचे लेखाधिकारी, व इतर शिक्षण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## रेशनिंगचा गहू काळ्या बाजारात विक्रीस चालविलेली गाडी पकडली

### पुरवठा विभाग व पोलिसांची कारवाई, दुकानदारासह दोघांवर गुन्हा दाखल

नगर - नगर शहरातील माळीवाडा परिसरातील बारातोटी कारंजा येथे स्वस्त धान्य दुकानावरील सरकारी रेशनिंगचा गहू बेकायदेशीरपणे काळ्या बाजारात विक्रीसाठी नेणाऱ्या पिकअप गाडीवर अन्नधान्य वितरण व पुरवठा विभाग आणि कोतवाली पोलिसांनी संयुक्त कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ५ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या प्रकरणी दुकानदारासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३१ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुम ारास माळीवाडा परिसरातील सुरेश रासकर यांच्या रास्तभाव दुकानासमोर ही कारवाई करण्यात आली. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अन्नधान्य वितरण विभागाच्या सपना म नोहर भोवते आणि पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप गाडीमध्ये (क्र.एमएच १६ सीसी ९६१९) फिकट क्रीम रंगाच्या प्लास्टिकच्या गोण्यांमध्ये अंदाजे ५० किलो वजनाच्या ३४ गोण्यांमध्ये एकूण १७ क्विंटल रेशनिंगचा गहू भरलेला आढळला.

घटनास्थळावर पोलिसांनी पिकअप चालक प्रकाश दत्तात्रय रासकर (रा. सारसनगर, अहिल्यानगर) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने, रास्तभाव दुकानदार सुरेश बबनराव रासकर (रा. माळीवाडा, अहिल्यानगर) याच्या सांगण्यावरून दुकानातील रेशनिंगचा गहू गोण्यांमध्ये भरून तो विक्रीसाठी नेण्यास सांगितल्याची माहिती दिली. पोलीस व प्रशासनाची चाहूल लागताच दुकानदार दुकानातून पळून गेला पोलिसांनी व पुरवठा विभागाच्या पथकाने दुकानदाराचे दुकान सील केले आहे. या प्रकरणी ४ लाख ५० हजार रुपयांची बोलेरो गाडी आणि ५१ हजार रुपयांचे १७ क्विंटल रेशनिंगचे धान्यासह एकूण ५ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी वाहनचालक प्रकाश रासकर आणि दुकानदार सुरेश रासकर यांच्याविरुद्ध आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## हरेगावच्या मतमाऊली यात्रेसाठी नगरमधून १० सप्टेंबरला पदयात्रा

नगर - सालाबादप्रमाणे यंदाही मतमाऊली हरेगाव यात्रेनिमित्त अहिल्यानगर शहरातून मोठ्या संख्येने भाविक पदयात्रेने हरेगाव (ता. श्रीरामपूर) येथे जाणार आहेत. १० सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता बोल्हेगाव येथून या पदयात्रेचे प्रस्थान होणार असून, ११ सप्टेंबर रोजी राहुरी येथून श्रीरामपूरच्या दिशेने पदयात्रा मार्गस्थ होणार आहे. १२ सप्टेंबर रोजी हरेगाव वेस ते चर्च अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. १२ व १३ सप्टेंबर रोजी मतमाऊली यात्रा पार पडणार असल्याची माहिती पद यात्रेचे प्रमुख प्रा. पंकज लोखंडे यांनी दिली.

ख्रिस्ती धर्मगुरू येशू संधिय, रेव्ह. आबा वाघमारे, रेव्ह. प्रकाश राऊत, रेव्ह. संपत भोसले यांच्या मार्गदर्शनाने मतमाऊली पदयात्रा कमिटीच्या वतीने या यात्रेला प्रारंभ होणार आहे. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या पदयात्रेत अहिल्यानगर शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने ख्रिस्ती समाजबांधवांसह इतर समाजबांधव देखील सहभागी होणार आहे. या पदयात्रेच्या प्रस्थानप्रसंगी आमदार संग्राम जगताप, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, माजी पोलिस निरिक्षक सुहासकुमार देठे, पा. प्रशांत चक्रनारायण, पा. अनिल कसबे, कार्यवाहक अभिमन्यु साळवे व राजेश फुलपगार, यात्रा कमिटीचे अध्यक्ष जॉन्सन लोखंडे, उपाध्यक्ष विशाल गायकवाड, सचिव राजू डोईफोडे, सहसचिव बाळासाहेब पाटोळे, कार्याध्यक्ष अमित लोखंडे, सहकार्याध्यक्ष निलेश साळवे, संघटक सनी भाकरे, सदस्य शरद वाकडे, अनिल डोईफोडे, जुबेर सय्यद, महादेव माने आदी उपस्थित राहणार आहेत. पदयात्रेचे संपूर्ण नियोजन प्रा. पंकज लोखंडे पाहत आहेत.

पदयात्रेसाठी नितिन साठे, सुदाम साळवे, मयूर साळवे, निलेश चक्रनारायण, प्रफुल्ल लोखंडे, प्रेशित चक्रनारायण, गौरव वाकडे, जॉकीन गायकवाड, राजेंद्र भोसले, दिलशाद अन्सारी, मंगेश घोडेकर, संतोष वाघ, जावेद सय्यद, शुभम डोईफोडे, तैमूर सय्यद आदी परिश्रम घेत आहेत.

महिला कमिटीच्या माध्यमातूनही पदयात्रेच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली जात आहे. महिला कमिटीच्या अध्यक्ष प्राजक्ता लोखंडे, सचिव कविता डोईफोडे, उपाध्यक्ष रिटा घोडेकर, क्लेरा लोखंडे तसेच पा. लता कसबे, प्रियंका साळवे, जयश्री गायकवाड, ज्योती साठे, अनिता लोखंडे, पूजा डोईफोडे, प्रांजली लोखंडे, शुभांगी डोईफोडे, शारदा गायकवाड, मनीषा चक्रनारायण, सारिका शिरसाठ, ईश्वरी चक्रनारायण, सारा गायकवाड, पुजा लोखंडे, सान्वी लोखंडे, साईश घोडेकर, निलोफर सय्यद, मुस्तफा सय्यद, आयान सय्यद आदी नियोजनात सक्रिय आहेत. स्व मधूकर खंडूजी लोखंडे (गुरुजी) प्रतिष्ठानचे राजेंद्र लोखंडे, रमेश लोखंडे, जॉर्ज लोखंडे, प्रशांत लोखंडे हे देखील पदयात्रेच्या यशस्वीतेसाठी काम पाहत आहेत. या पदयात्रेत सहभागी होऊन मतमाऊली यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### नोकरदार महिलांसाठी आहार

आजच्या धावपळीच्या युगात महिला नोकरी आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत आहेत. मात्र या धावपळीत त्या स्वतःच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करतात. सकाळी घाईगडबडीत नाश्ता न करणे, दुपारचे जेवण उशिरा करणे आणि रात्री जड जेवण घेणे यामुळे थकवा, अशक्तपणा, केस गळणे आणि चिडचिडेपणा वाढतो. अशा वेळी योग्य आहार नियोजन केल्यास दिवसभर उत्साही आणि निरोगी राहता येते. सकाळची सुरुवात एक ग्लास कोमट पाणी आणि चार ते पाच भिजवलेले बदाम खाऊन करावी. त्यानंतर पोहे, उपमा, इडली किंवा फळे असा हलका व पौष्टिक नाश्ता घेणे आवश्यक आहे. दुपारच्या डब्यात दोन चपात्या, भाजी, डाळ, भात आणि दही किंवा ताक असावे. रोज बाहेरचे तेलकट पदार्थ खाणे टाळून घरचे जेवण घ्यावे. संध्याकाळी पाच वाजता चहा बिस्किटांऐवजी मुरमुरे, भाजलेले चणे, नारळ पाणी किंवा एखादे फळ घेतल्यास संध्याकाळचा थकवा दूर होतो. रात्रीचे जेवण आठ ते नऊच्या दरम्यान आणि हलके असावे. त्यात ज्वारी बाजरीची भाकरी, वरण आणि कोशिंबीर यांचा समावेश करावा. झोपण्यापूर्वी हळदीचे दूध घेतल्यास झोप चांगली लागते. यासोबतच दिवसभरात आठ ते दहा ग्लास पाणी पिणे, कॅल्शियमसाठी दूध व नाचणी आणि लोहासाठी पालक, गूळ व कुळथाचा वापर आहारात करणे हितकारक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेवणाच्या वेळा पाळणे. लक्षात ठेवा कुटुंबाला सावरण्यासाठी आधी स्वतः सुदृढ असणे गरजेचे आहे.

## पाककला

### कट वडा

**साहित्य :** बेसन १ वाटी, मैदा २ चमचे, बारीक चिरलेला कांदा १ मध्यम, बारीक चिरलेली हिरवी मिरची २, आले-लसूण पेस्ट १ चमचा, हळद १/४ चमचा, ओवा १/४ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, चवीनुसार मीठ, तळण्यासाठी तेल, कांदा १ मोठा, टोमॅटो १ मध्यम, सुके खोबरे किसलेले २ चमचे, लसूण पाकळ्या ४, काळा मसाला १ चमचा, लाल तिखट १ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, पाणी २ कप, तेल २ चमचे, मीठ चवीनुसार.

**कृती :** प्रथम कटासाठी कांदा, टोमॅटो, खोबरे आणि लसूण थोड्या तेलावर भाजून घ्या. थंड झाल्यावर मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. कढईत तेल गरम करून त्यात वाटलेले वाटण परता. त्यात काळा मसाला, लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घालून २ कप पाणी घाला. कटाला उकळी येईपर्यंत मध्यम आचेवर शिजवा. आता वड्यासाठी बेसन, मैदा, चिरलेला कांदा, हिरवी मिरची, आले-लसूण पेस्ट, हळद, ओवा, कोथिंबीर आणि मीठ घालून घट्ट मिश्रण एकजीव करा. गरज वाटल्यास थोडे पाणी घाला. कढईत तेल गरम करून या मिश्रणाचे छोटे-छोटे वडे मध्यम आचेवर खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या. तळलेले वडे कापून प्लेटमध्ये ठेवा. त्यावर तयार गरमागरम झणझणीत कट ओता. वर बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर आणि लिंबू पिळून पाव किंवा भाकरीसोबत गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### १ बीएचके साठी

* स्वयंपाकघरात काळा आणि निळा रंग टाळावा. बेडरूममध्ये बेड शक्यतो नैऋत्य दिशेला ठेवावा आणि झोपताना डोके दक्षिणेला असावे, यामुळे गाढ झोप लागते. बेडसमोर आरसा असेल तर तो झोपताना दिसणार नाही याची काळजी घ्यावी.

* देवघर हे ईशान्य दिशेला ठेवणे सर्वात शुभ असते, जागा नसेल तर भिंतीवर लहान कपाट करून तिथे देव ठेवावेत, मात्र देवघर बेडरूममध्ये ठेवू नये.

* तिजोरी किंवा मौल्यवान वस्तू उत्तर दिशेला उघडेल अशा पद्धतीने ठेवावी. घरात सकारात्मक ऊर्जा राहण्यासाठी रोज सकाळी कापूर जाळावा.

## सौंदर्य

गुलाबपाणी हे नैसर्गिक टोनर आहे. रोज रात्री कापसाच्या बोळ्याने गुलाबपाणी चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरची धूळ निघून जाते आणि त्वचा ताजी दिसते. एक छोटी बाटली महिनाभर पुरते.

## सल्ला

गॅस वाचवण्यासाठी पहिला उपाय म्हणजे शिजवण्यापूर्वीची तयारी. डाळ, हरभरा, राजमा यांसारखी कडधान्ये रात्रभर पाण्यात भिजत ठेवल्यास ती लवकर शिजतात आणि गॅस वाचतो. दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे कुकरचा वापर. भाजी किंवा डाळ कढईत शिजवण्यापेक्षा कुकरमध्ये शिजवल्यास वेळ आणि गॅस दोन्ही वाचतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, कृत्तिका २४।३०, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात यश मिळेल. आर्थिक लाभ होईल.

**वृषभ :** खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळाल.

**मिथुन :** नवीन संधी मिळेल. प्रवास घडेल.

**कर्क :** कामे पूर्ण होतील. मन प्रसन्न राहील.

**सिंह :** मान वाढेल. व्यवसायात प्रगती होईल.

**कन्या :** गुंतवणूक लाभदायी ठरेल. संयम ठेवाल.

**तूळ :** जोडीदाराची साथ मिळेल. दिवस शुभ आहे.

**वृश्चिक :** धनलाभ होईल. शत्रूंवर विजय मिळवाल.

**धनु :** विद्यार्थ्यांना यश मिळेल. आनंद मिळेल.

**मकर :** मालमत्तेचा प्रश्न सुटेल. घरात शांतता ठेवाल.

**कुंभ :** भावंडांची मदत मिळेल. प्रवास होईल.

**मीन :** पैशांची आवक वाढेल. वाणीवर नियंत्रण ठेवाल.

## शब्दगंध क्र. ७५०८ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द -:** १) 'सम'च्या विरुद्ध; व्यस्त ३) पंजाबमधील एक प्रमुख नदी ६) ज्याला मरण नाही असा ७) क्षोभ; दंगा ९) जसे काय १०) कमतरता; उणीव; कसर ११) शिकार १३) लक्ष्मीचा पती; विष्णू १५) एक ऋतू; पाऊस; पर्जन्य; वृष्टी १६) फुलातील गोड रस; मकरंद १८) निर्बळ; अज्ञान किंवा अज्ञानी १९) दोन हातांतील जास्तीतजास्त अंतर; मोका; संधी २०) ताजा; अलीकडचा २१) चंचल; क्षणिक पातळ

**उभे शब्द :-** २) सहा कोन ३) जाण; धमकी; शहाणपण ४) गत्यंतर; सद्गती; बचाव; धडगत ५) कृष्णाच्या सूचनेनुसार भीमाने मगधच्या या राजाला मारले ७) साहित्यातील एक लिखाण प्रकार ८) एक मराठी आडनाव १२) एकेक बाब घेऊन १४) श्रीमंत; धनवान; सधन; तालेवार १७) पांढरा शुभ्र १८) नवरा; पती; स्वामी

### शब्दगंध क्र. ७५०७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | ज | ल | ■ | तु | का | रा | म |
| हा | र | क | ■ | स | ■ | न | ■ |
| भा | ■ | वा | क | डा | ति | क | डा |
| र | स | ■ | ह | ■ | ख | ट | का |
| त | क्ष | क | ■ | बो | ट | ■ | ■ |
| ■ | म | ळ | म | ळ | ■ | रा | ब |
| ■ | ■ | क | ■ | ■ | अं | ग | द |
| सं | क | ट | मो | च | क | ■ | ला |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : चांगले कर्म हाच खरा धर्म आहे, बाकी सर्व व्यर्थ आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### हाडे लोखंडापेक्षा मजबूत असतात हे खरे आहे का?

लहान मित्रांनो तुम्ही कधी विचार केला आहे का की आपले शरीर एवढे मोठे वजन कसे पेलते, आपण कसे धावतो, उड्या मारतो, ओझे उचलतो आणि तरीही आपण कोलमडून पडत नाही. याचे संपूर्ण श्रेय जाते आपल्या शरीरातील हाडांना आणि म्हणूनच विज्ञान सांगते की आपली हाडे ही लोखंडापेक्षाही मजबूत असतात. हे ऐकून तुम्हाला धक्का बसेल पण ही गोष्ट खरी आहे. शास्त्रज्ञ जेव्हा ताकद मोजतात तेव्हा ते फक्त कठीणपणा पाहत नाहीत तर वजनाच्या तुलनेत कोण जास्त मजबूत आहे हे पाहतात आणि या मोजमापात हाडे लोखंडाला सहज हरवतात. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की आपल्या शरीरातील हाडे ही वजनाच्या मानाने लोखंडापेक्षा पाच पट अधिक मजबूत असतात. एका प्रयोगात असे दिसून आले आहे की काडेपेटीच्या आकाराचा हाडाचा एक छोटासा तुकडा तब्बल नऊ टन वजन पेलू शकतो म्हणजेच चार मोठे हत्ती एका छोट्याशा हाडाच्या तुकड्यावर उभे केले तरी तो तुकडा तुटणार नाही.

आपल्या मांडीत असलेले फिमर नावाचे हाड जे शरीरातील सर्वात मोठे हाड आहे ते एकटे बाराशे ते पंधराशे किलो वजन पेलण्याची क्षमता ठेवते म्हणजे एक छोटी मारुती कार त्यावर ठेवली तरी ते तुटणार नाही. आता तुमच्या मनात प्रश्न येईल की लोखंड तर दिसायला एवढे कठीण आणि टणक असते मग पोकळ असलेले हाड त्यापेक्षा मजबूत कसे. तर याचे उत्तर लपले आहे निसर्गाच्या अफलातून इंजिनिअरिंगमध्ये. निसर्ग हा सर्वात मोठा इंजिनिअर आहे. त्याने हाडाला आतून पूर्णपणे भरीव न बनवता पोकळ आणि आतून मधाच्या पोळ्यासारखे बारीक जाळीदार बनवले आहे. तुम्ही बांबू पाहिला आहे का, बांबू आतून पोकळ असतो तरीही तो किती मजबूत असतो की त्यावरून मोठमोठ्या इमारतींचे काम चालते अगदी त्याच पद्धतीने हाडांची रचना आहे.

पोकळ असल्यामुळे हाडांचे वजन खूप कमी राहते आणि त्यामुळे आपल्याला चालणे, धावणे सोपे जाते जर हाडे लोखंडासारखी भरीव असती तर आपले वजन तीनशे किलो झाले असते आणि आपल्याला एक पाऊलही टाकता आले नसते. दुसरे मोठे कारण म्हणजे हाड हे एकाच पदार्थापासून बनलेले नाही तर ते दोन वेगवेगळ्या पदार्थांचे अप्रतिम मिश्रण आहे. त्यात कॅल्शियम फॉस्फेट नावाचे एक कठीण खनिज आहे जे त्याला दगडासारखी कणखरता देते आणि त्यासोबतच कोलेजन नावाचे एक चिकट प्रोटीन आहे जे त्याला रबरासारखी लवचिकता देते. जर हाडात फक्त कॅल्शियम असते तर ते शाळेतील खडू सारखे ठिसूळ झाले असते, जरा धक्का लागला की तडकले असते आणि जर फक्त कोलेजन असते तर ते रबरासारखे वाकले असते, शरीराचा आकारच टिकला नसता. पण दोन्हीचे मिश्रण असल्याने हाड कठीणही आहे आणि थोडे लवचिकही आहे. जेव्हा आपण पडतो तेव्हा ते थोडे वाकून तो धक्का सहन करते आणि लोखंडासारखे लगेच तुटत नाही. तिसरा आणि सगळ्यात महत्त्वाचा फरक म्हणजे लोखंड ही एक निर्जीव वस्तू आहे एकदा त्याला गंज लागला किंवा ते तुटले की ते तसेच राहते पण हाड ही एक जिवंत वस्तू आहे. हाडाच्या आत सतत रक्त फिरत असते आणि नवीन पेशी तयार होत असतात. म्हणूनच जेव्हा हाडाला चरा जातो किंवा ते मोडते तेव्हा आपले शरीर लगेच तिथे नवीन हाडाचे सिमेंट पाठवते आणि काही आठवड्यात ते आपोआप जुळून येते जे लोखंड कधीच करू शकत नाही. म्हणूनच डॉक्टर प्लास्टर लावतात जेणेकरून तुटलेले हाड एका जागी स्थिर राहील आणि शरीर त्याला आतून जोडून टाकेल. पण मित्रांनो मजबूत आहे म्हणून हाड कधीच तुटणार नाही असे नाही. प्रत्येक वस्तूला तुटण्याची एक दिशा असते.

लाकडाची काठी लांबीने खूप मजबूत असते पण तिला आडवी वाकवली की ती तटकन तुटते तसेच हाडाचे आहे. सरळ वजन ते खूप पेलते पण तिरक्या दिशेने जोर आला तर ते मोडू शकते म्हणूनच खेळताना काळजी घ्यावी लागते. ही एवढी मजबूत हाडे टिकवण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल तर त्यासाठी तीन मित्रांना कायम सोबत ठेवावे लागेल. पहिला मित्र म्हणजे कॅल्शियम जे आपल्याला दुधात, दह्यात, पनीरमध्ये, नाचणीत आणि पालक सारख्या हिरव्या भाज्यांमध्ये मिळते. दुसरा मित्र म्हणजे व्हिटॅमिन डी जे सकाळच्या कोवळ्या उन्हातून मिळते, व्हिटॅमिन डी शिवाय कॅल्शियम हाडांमध्ये जातच नाही. आणि तिसरा मित्र म्हणजे खेळ आणि व्यायाम. जेवढे तुम्ही जास्त उड्या माराल, धावाल, खेळाल तेवढी तुमची हाडे आतून अधिक घट्ट होत जातात. जे मुले दिवसभर मोबाईलवर बसून असतात त्यांची हाडे कमकुवत होतात. त्यामुळे लक्षात ठेवा तुमच्या शरीरात देवाने दिलेले लोखंडापेक्षाही मजबूत असे दोनशे सहा हिरे आहेत त्यांना जपा.

### चोरीचा परिणाम

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका छोट्या गावात रघू नावाचा एक मुलगा राहत होता. रघू अतिशय हुशार होता पण त्याला एक वाईट सवय लागली होती. त्याला दुसऱ्यांच्या वस्तू चोरण्याची सवय होती. सुरुवातीला तो शाळेत पेन्सिल, खोडरबर अशा छोट्या वस्तू चोरायचा. कोणी पाहिले नाही म्हणून त्याला वाटायचे की आपण खूप हुशार आहोत आणि कोणीही आपल्याला पकडू शकत नाही. हळूहळू त्याची ही सवय वाढत गेली. तो बाजारातून फळे चोरू लागला, शेजाऱ्यांच्या घरातून पैसे चोरू लागला. गावातील लोकांना कळत होते की कोणीतरी चोरी करत आहे पण रघूवर कोणाच संशय येत नव्हता कारण तो सगळ्यांशी गोड बोलायचा.एक दिवस गावात एक मोठा साधू आला. साधूने गावातल्या लोकांना सांगितले की मी उद्या सकाळी सगळ्यांना एक जादूचा मंत्र देणार आहे ज्यामुळे तुमचे दुःख दूर होईल. दुसऱ्या दिवशी सगळे गावकरी साधूच्या दर्शनाला गेले.

रघूही गेला. साधूने प्रत्येकाला एक एक सफरचंद दिले आणि म्हणाला हे साधे सफरचंद नाही, हे जादूचे सफरचंद आहे. रात्री हे सफरचंद उशीखाली ठेवून झोपा, सकाळी तुमचे जे दुःख आहे ते दूर होईल. पण एक अट आहे, हे सफरचंद घरी नेऊन उघडून पाहू नका, थेट उशीखाली ठेवा. सगळ्यांनी होकार दिला आणि आपापले सफरचंद घेऊन घरी गेले.रघूच्या मनात मात्र लगेच चोरीचा विचार आला. त्याला वाटले या साधूच्या पिशवीत अजून अशी कितीतरी जादूची सफरचंदे असतील, मी ती सगळी चोरली तर मी खूप श्रीमंत होईन. रात्री सगळे झोपल्यावर रघू हळूच साधूच्या झोपडीत शिरला आणि त्याने सफरचंदाची पिशवी चोरून आणली. घरी येऊन त्याने पिशवी उघडली तर त्यात एकही सफरचंद नव्हते, त्यात फक्त काळे दगड होते. रघूला खूप राग आला.

तो साधूकडे गेला आणि म्हणाला तुम्ही मला फसवले. साधू हसला आणि म्हणाला मी तुला फसवले नाही, तू स्वतःलाच फसवलेस. मी सगळ्यांना दिलेली सफरचंदे ही साधीच होती, जादू सफरचंदात नव्हती तर तुमच्या प्रामाणिकपणात होती. जो प्रामाणिक राहील, कष्ट करेल त्याचे दुःख दूर होईल हा त्याचा अर्थ होता. पण तू चोरी केलीस आणि तुझ्या चोरीच्या परिणामामुळे तुला दगडच मिळाले.

जर तू मेहनत केली असतीस तर त्या एका सफरचंदाचेही झाड झाले असते.साधूचे बोलणे ऐकून रघूला आपली चूक कळली. त्याला समजले की चोरी करून मिळवलेली वस्तू कधीच सुख देत नाही. आज छोटी चोरी केली तर उद्या मोठी करण्याची हिंमत होते आणि शेवटी एक दिवस सगळ्यांसमोर लाज वाटते, तुरुंगात जावे लागते आणि कोणीही विश्वास ठेवत नाही. त्या दिवसापासून रघूने चोरी करणे सोडून दिले आणि तो कष्ट करून प्रामाणिकपणे जगू लागला.

तात्पर्य - चोरीचा परिणाम हा नेहमीच वाईट असतो, चोरी केलेली वस्तू कधीच पचत नाही.

## आत्मशक्ति



### मोहाच्या जगात

त्याचा अर्थ लावला जातो व मग कळते की आम्ही काय पाहिले आहे. आवाजाच्या लहरी आमच्या कानाने ऐकण्याच्या मार्गे मेंदूकडे जातात. त्यायोगे आपण त्या आवाजाचा व भाषणाचा अर्थ समजू शकतो. आमच्या मेंदूतील भाषा जाणणारा भाग, अर्थ काढतो व मग पुढील प्रक्रिया घडतात. त्याप्रमाणेच आमची जीभ आणि नाक स्वाद व गंध जाणण्यासाठी संकेत ग्रहण करतात. आमच्या त्वचेवरील रोम छिद्रे त्वचेला झालेला स्पर्श ग्रहण करून मेंदूकडे पाठवितात. तेव्हा आम्ही थंड वा गरम वस्तूला स्पर्श केला आहे हे कळते. अशाप्रकारे ही इंद्रिये आमचा 'आत्मा ह्या मायेच्या आणि मोहाच्या जगात कोणत्या वेळी कोठे आहे हे सांगतात. त्यांच्याच माध्यमातून आम्ही आम चे विचार, मते, योजना आणि कार्य पध्दती जगात व्यक्त करतो. जेव्हा आम्हाला एखाद्या गोष्टीची गरज वाटते तेव्हा तसा संदेश मेंदूकडे पाठविला जातो. मग त्याद्वारा आम्हाला ती गरज, भूक व तहान लागली आहे; आम्हाला हवेची गरज आहे. कपडे हवेत, घर पाहिजे आहे वा कोण्या धोक्यापासून शरीरास संरक्षण हवे, हे सांगू शकतो.जर आम्हाला मन दिले नसते तर जगाच्या घडामोडी आम्हाला समजू शकल्या नसत्या. मन अनेक कामे करते. ते विचारांचे पृथक्करण करते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### मेंदूचा विकास

आत्मा एखाद्या ऑपरेटर, चालकासारखा आहे. तर मेंदू कम्प्यूटरसारखा आहे आणि शरीर म्हणजे त्या कम्प्यूटरला जोडलेलं मशीन आहे. ऑपरेटर म्हणजे 'मी', कम्प्यूटरला सूचना देतो. कम्प्यूटर म्हणजे मेंदू त्यावर प्रक्रिया करतो. मग तो शरीराला म्हणजे मशीनला संकेत पाठवतो आणि शरीर त्याप्रमाणे खाणं, बोलणं इ. क्रिया करतं. त्यामुळे सगळी शक्ती ही ऑपरेटरकडे असते. जेव्हा कोणी कोमामध्ये असतं तेव्हा ऑपरेटर नीट असतो पण कम्प्यूटर माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी सक्षम नसतो.बाळाच्या बाबतीतही असंच आहे. शरीराची (मशीन) वाढ अजून व्हायची आहे त्यामुळे बाळ नीट चालू किंवा बोलू शकत नाही. मेंदूचाही (कम्प्यूटर) विकास होत आहे आणि त्याला अजून तर्क समजत नाही. त्याचा आत्मा (ऑपरेटर) नाही तर शरीररूपी मशीन एक वर्षाचं आहे.

सुरेश ओबेरॉय : एकदा माझ्या मुलीला कुठेतरी जायचं होतं. तिचा मुलगा माझ्या बरोबर खेळत असताना ती हळूच निघून गेली. थोड्या वेळाने तो आईला शोधायला लागला आणि खूप रडला. म्हणून मी तिला म्हणालो की तू त्याला सांगून जात जा. पुढच्या वेळेस तिने माझ्या नातवाला सांगितलं, की ती बाहेर जात आहे आणि ती परत येईपर्यंत तुला आजोबांकडे राहायचं आहे. नातू दहा महिन्यांचा असूनही त्याला सगळं समजलं.

शिवानीदीदी : कोणाला सगळं समजलं?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : सांग, गाढवाला इंग्लिशमध्ये काय म्हणतात?

पप्पू : सर, प्रश्न कठीण आहे, ऑप्शन द्या!

शिक्षक : Donkey

पप्पू : सर, एवढा कठीण ऑप्शन?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कुळीथला इंग्रजीमध्ये काय म्हणतात?

– हॉर्स ग्राम

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कुळीथ

कढण प्यावे. त्याचबरोबर पुरुषांमधील शुक्रवहस्रोतसा संदर्भातील व्याधी नष्ट करण्यासाठी व आलेली सूज घालविण्यासाठी कुळीथ उपयोगी आहे.

२) स्त्रियांमध्ये गर्भाशयासंदर्भातील, तसेच अंगावरून पांढरे जाणे या विकारावर कुळथाचा उपयोग होतो.

३) कुळीथ उकळून ते पाणी गाळून घ्यावे. हे पाणी भाताबरोबर थोडेसे तिखट, हिंग व लसूण यांची फोडणी देऊन प्यायला द्यावे. यामुळे रक्ताचे प्रमाण वाढून वातविकार कमी होतात.

४) कुळथाची उसळ बनवून ती खाल्ल्याने उदर रोग बरा होतो.

५) कुळीथ, पाषाणभेद व गोक्षुर यांचा काढा करून प्यायल्याने मूत्रखडा विरघळून लघवीद्वारे पडून जातो.

६) आहारामध्ये नियमितपणे कुळीथ खाल्ल्यास वाढलेले वजन आटोक्यात येऊन शरीर सुडौल बनते.

७) थंडीतापामध्ये सुरुवातीला थंडी वाजून नंतर खूप घाम येतो. अशा वेळी घाम बंद करून शरीरात उष्णता आणण्यासाठी कुळथाच्या पिठाने त्वचेवर उद्वर्तन (चोळावे) करावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘एसा’च्या सामाजिक उपक्रमातून ‘अनाम प्रेम’ प्रकल्पाला संगणक भेट



‘एसा’तर्फे सामाजिक उपक्रमातून ‘अनाम प्रेम’ प्रकल्पाला संगणक भेट देताना अध्यक्ष प्रदीप तांदळे व पदाधिकारी, सभासद. (छाया-लहू दळवी)

नगर-आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून संचालक मंडळ व संस्था सभासदांसाठी ‘अनाम प्रेम’ प्रकल्प भेट आणि रक्षाबंधन उपक्रम राबविण्यात आला. निंबळक येथील खडकाळ डोंगरात, जिथे गवतही उगवणार नाही अशा ठिकाणी ‘अनाम प्रेम’च्या कार्यकर्त्यांनी अंध, अपंग व मूकबधिर मुलांसाठी नंदनवन उभे केले आहे. त्यांच्या समर्पित वृत्तीने केलेल्या कार्यामुळे अनेक मुलांचे आयुष्य उजळून निघाले आहे.

‘एसा’च्या संचालक मंडळाने मागील वर्षी शिशु संगोपन येथे रक्षाबंधनानिमित्त शाळेतील मुली व त्यांच्या संस्थेसाठी उपयोगी ठरेल असा संगणक भेट दिला होता. यंदाही संचालक मंडळाच्या वतीने ‘अनाम प्रेम’ संस्थेला एक संगणक भेट देण्यात आला. दरम्यान, ‘एसा’च्या एका सभासदाने १०० पॅकेट फरसाण-मुरमुरे ‘अनाम प्रेम’ येथील मुलींसाठी दिले.

अजित माने व अनिता माने तसेच संपूर्ण ‘अनाम प्रेम’ परिवाराने ‘अनाम प्रेम’ची स्थापना करण्यापासून ते संस्थेचा विस्तार करण्यापर्यंत आपले पूर्ण आयुष्य समर्पित भावनेने व्यतीत केले आहे. या विषयी माहिती देताना ‘अनाम प्रेम’चे अध्यक्ष अजित माने यांनी सांगितले की, २००५ साली अंध, अपंग, दिव्यांग आणि मूकबधिर मुलांसाठी ‘सत्यमेव जयते ग्राम’, रवीनंदा संकुल येथे संस्थेच्या कार्याची सुरुवात करण्यात आली. संस्था शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व पुनर्वसन या चतुःसूत्रीवर लोकसहभागातून कार्य करत आहे. ‘अनाम प्रेम’मध्ये सध्या २३५ अंध, अपंग, मूकबधिर व गतिमंद मुले-मुली वास्तव्यास आहेत. पुणे, नगर व संभाजीनगर येथे संस्थेचे विविध प्रकल्प कार्यरत आहेत.

‘अनाम प्रेम’ने उभारलेल्या या प्रकल्पाला सर्वांनी आवर्जून भेट द्यावी आणि शक्य असल्यास संस्थेने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन ‘एसा’चे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी केले.

या उपक्रमास ‘एसा’चे उपाध्यक्ष सुनील औटी, सचिव भूषण पांडव, संतोष खांडेकर, अनमोल जैन, साजिद शेख, अमोल येनगंदुल, संतोष राजापुरे, महेश तांदळे, रमेश बोऱ्हूडे, आदिनाथ आंबेकर, गौरव मांडगे, सचिन डागा, रोशन गुगळे, सागर ढगे, संदीप पाटील, रोहित लुणिया, राकेश राऊत हे सभासद व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

तसेच विविध क्षेत्रांतील अतिथींमध्ये माजी पं. स. उपसभापती डॉ. दिलीप पवार, महेश घावटे, सौ. नीताताई घावटे, प्रणाली तांदळे, तरन्नुम मॅडम, फरहीन मॅडम, वंदना कुलकर्णी, मोनालीताई बोरूडे, प्राची ताई, ॲड. किरण जाधव, इंजि. प्रशांत आढाव, इंजि. अनिल धोकरिया, शिवगुंडे सर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संस्था सहसचिव अनमोल जैन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सवयीचा गुलाम

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




माणसाच्या वयाला साथ कुणाची? त्याच्या अंगभूत सवयींची. जरठ वयाबरोबर सवयीला मुरड घालणारी जडच जाते. वयाबरोबर अंगातली शक्ती कमी व्हायला लागते. पण सवयींची सत्ती मात्र वाढतच जाते। वयाला आवरणे तसे सवयीला निवारणे कठीण होते. वय जन्मजात, तर सवय स्वभावजात. खरं तर स्वभावाला स्वभावच नाही. तो कायम एका दिशेने जात नाही, पण त्या स्वभावातूनच निर्माण झालेली सवय मात्र कधी रस्ता बदलत नाही. जाणवणारे गुण आणि घडणारी क्रिया ही स्वभावाचीच प्रतिक्रिया, गुण इन मीन तीन, पण क्रिया मोजणेच कठीण गुणांना नाही अंत आणि क्रिया तर अनंत । तरी स्वभाव आणि सवय एकदा का जडली तर पदोपदी नडली। मूळ स्वभाव बदलत नाही. जन्माची सवय पालटत नाही.

पाण्याचा स्वभाव वाहणे, पण कधी पाणी चढते तर कधी उतरते. कुणी संथ वाहा म्हणून सांगितल तरी ते का ऐकते ? नागमोडी वळणेदेखील घेते. आपला स्वभाव का कधी बदलते ? नागमोडी सवय का कधी टाकते ? अहो, पशुपक्ष्यांचे तर विचारुनच नका । कुण्या एका पक्ष्याचे दुसऱ्या पक्षाशी जुळले ? एकसारखेच दुसऱ्यानेही आवाज काढले? खाण्याच्या आवडी निवडीत एकसारखे वागले ? भय किंवा कौर्य टाकून सगळेच साधुसंत बनले ? एकाच जमिनीतून उगवणारी झाडे तरी का सारखी ?

ती प्राण सखा। सवयच त्याच्या सहवासाची सतत झालाच नाही तो कधी दूर, क्षणासाठी देखील, पण आता? आता त्याच्या पावलांचा ध्वनी येतोय कानी ? सखे ऐकलास ना गं तू? अगं, कान देउन ऐक. युगं लोटली तरी तो येतोच आहे. अशीच होती त्याची चाल मंद, मंद,

ज्ञानेश्वर माउली भ्रमराला त्याची सवय सोडायला सांगतात, रुणझुणू रुणझुणू रे भ्रमरा । सांडी तू अवगुणू रे भ्रमरा ।। ते म्हणतात.

अरे भ्रमरा, का भटकतोस सारखा इकडे तिकडे? मनाला लागलेली भुणभुण ऐकतोय मी. रुणझुण रुणझुण, अशा तुझ्या भाषेत. जाईल ती भुणभुण, पण त्यासाठी टाक तुझ अवगुण, किती रे चंचल तुझं मन ? क्षणात या फुलावर, तर लगेच दुसऱ्या फुलात मग्न। अरे, सोड ही वृत्ती. लाव ती विठ्ठल चरणाच्या कमळदळी। टाकावी वाईट सवय. लावावी चांगली.

उपनिषदातली कहाणी आहे. एकाने केली चोरी. सवयच जन्माची आजवर दुसरे कुठे काय केले तरी ? शिताफीनं काढायचा अंगावरचे अलंकारसुद्धा अलगद त्याची तक्रार गेली राजाकडे. एरव्ही गुणी, खानदानी, मूर्ती देखणी ण आता चोरी केली नि प्रत्यक्ष राणीच्याच दागिन्यांची ? राणी चिडली. फासावर लटकवा म्हणाली.

तो चोर घाबरला. राजाच्या पायावर लोळण घेउ लागला. यापुढे जन्मात कधी चोरी करणार नाही. हे शपथपूर्वक सांगू लागला. राजाही कळवळला. त्या चोराला राजाने त्याचे खांदे धरुन वर उचलले. त्याला क्षमा केली, पण लगेच त्याच्या कानात सांगितले, मी तुला उचलायला वाकलों. तेवढ्यात माझ्या बोटातली चोरलेली अंगठी मात्र परत कर चोर शरमला. कशी ही सवय नाही करत केव्हाही गय।।

– किशोर गांधी

# पद्मशाली समाजातील पदवीधारक व शिक्षकांचा ६ सप्टेंबरला सत्कार

नगर – गुरुवर्य पोट्यन्ना बतीन शैक्षणिक सामाजिक मंडळाच्या वतीने पद्मशाली समाजातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा गौरव करण्यासाठी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता हा समारंभ होणार असून, समाजातील गुणवंत पदवीधारक आणि शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.

सन २०२६ या शैक्षणिक वर्षात पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पद्मशाली समाजातील विद्यार्थ्यांचा या समारंभात सत्कार करण्यात येणार आहे. तसेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून समाजातील सेवेत कार्यरत असलेल्या तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचाही विशेष गौरव केला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाला प्रोत्साहन देण्याबरोबरच शिक्षकांच्या ज्ञानदानाच्या कार्याचा सन्मान करण्याच्या उद्देशाने मंडळातर्फे हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो.

सत्कारासाठी पात्र असलेल्या पदवीधारकांनी आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करून मंडळाकडे नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नावनोंदणीसाठी शंकरराव नक्का (मो. ९८६०८४७१८४, रंगार गल्ली, राधाकृष्ण मंदिराजवळ), नारायण एक्कलदेवी (मो. ९४२३७५०९८४, दातरंग मळा), मारुती अरकल (मो. ९८५०२२९९३१, वसंत टेकडी, नित्यसेवा सोसायटी) तसेच दत्तात्रय जोग (मो. ९२७००२५००३, पाईपलाईन रोड) यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष नारायण मंगलारम, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम आणि सचिव श्रीनिवास एल्लाराम यांनी केले आहे.

# ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशनकडून जागतिक फोटोग्राफीदिन साजरा


जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात करण्यात आला.

नगर – ब्राह्मण बिझनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन आयोजित जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त अहिल्यानगर शहरातील छायाचित्रकारांचा प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ छायाचित्रकार देवीप्रसाद अय्यंगार, अनिल शहा, संजय दळवी, सिद्धार्थ दीक्षित, राहुल विळदकर, मंदार साबळे, हितेन ओबेरॉय, ओंकार बेद्रे, आनंद विभूती, बद्रीनाथ महाजन आदी उपस्थित होते. यावेळी उद्योजक आणि संस्थेचे अध्यक्ष चिन्मय सुखटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कॅमेरा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सर्व उपस्थित छायाचित्रकारांनी या क्षेत्रातील कारकीर्द आणि त्यातील अनुभव, गमतीजमती प्रकट मुलाखतीद्वारे कथन केले.

अय्यंगार म्हणाले, छायाचित्रण अर्थात फोटोग्राफी ही एक समृद्ध कला असून अनेक क्षण टिपताना ते ऐतिहासिक होतात. नगरचा फोटोग्राफी या क्षेत्रातील दबदबा वादादीत असून अनेक दिग्गज फोटोग्राफर नगरने विश्वाला दिले आहेत. फोटोग्राफीचा वारसा पुढे चालवताना कालानुरूप बदल करत आपल्या पॅशनला बळ द्यावे. प्रत्येक फोटोग्राफ एक ऐतिहासिक क्षणांचा सोबती असतो तो जतन करण्यासाठी फोटोग्राफर झटत असतो. कालानुरूप बदल घडले तरी फोटोग्राफरचे महत्त्व अबाधित राहिल, असे त्यांनी सांगितले.

फोटोग्राफीकडे कसे वळलो आणि आपले या क्षेत्रातील गुरू कोण याबद्दल सविस्तर माहिती दिली. नगरमधील सर्वात जुना नरसु पुप्पाल यांचा फोटो स्टुडिओ, गुजराथी, शहा यांचा स्टुडिओ, गुलाबचंद शहा, विनोद शहा यांच्या आठवणी, काश्मीरमधील अनुभव छायाचित्रकारांनी सांगितले.

छायाचित्रणातील महत्त्वाचे बदल, लोकांचा बदलेला कल, आव्हाने, विविध पत्रकारांनी संपादकांनी दिलेली फोटोला कॅप्शन, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशित झालेले छायाचित्र आणि त्यांचा एकूण प्रवास कसा झाला, प्री वेडिंग फोटोशूट, ड्रोन कॅमेरा आणि त्याच्या माध्यमातून टिपलेला पाणीप्रश्न अशा अनेक विषयावर मनसोक्त गप्पा मारल्या. मंदार साबळे, हितेन ओबेरॉय आणि ओंकार बेद्रे यांना वन्यजीवांची छायाचित्रे टिपताना आलेले चित्तथरारक प्रसंग प्रस्तुत केले. नगरमधील ज्येष्ठ छायाचित्रकार दत्ता खोजे, दत्ता इंगळे, जितेंद्र अग्रवाल यांच्या आठवणींना उजाळा दिला आणि त्यांना श्रद्धांजली वाहिली.

संस्थेचे विश्वस्त निखिल कुलकर्णी यांनी संस्थेची माहिती दिली तसेच संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली. स्नेहल धर्माधिकारी, श्रीपाद पुणतांबेकर, उमेश भालेराव, अपूर्वा काळे, वर्षा जोशी यांनी परिचय करून दिला. शैलेश राजगुरू यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी हेमंत लोहगावकर, शिल्पा सोमणी, आसावरी नातू, मिलिंद कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगरमध्ये प्रथमच ‘भारत गॅस लाईट झिप’ सिलिंडरचे लोकार्पण

### आनंद गॅस एजन्सीचा पुढाकार; घरगुती स्वयंपाकासाठी १० किलोचा हलका व आधुनिक कॉम्पोझिट एलपीजी सिलेंडर उपलब्ध



भारत पेट्रोलियमच्या आधुनिक ‘भारत गॅस लाईट झिप’ या १० किलो कॉम्पोझिट एलपीजी सिलेंडरचे अहिल्यानगरमध्ये प्रथमच आनंद गॅस एजन्सीच्या वतीने उत्साहात लोकार्पण करण्यात आले.

नगर – भारत पेट्रोलियमच्या आधुनिक ‘भारत गॅस लाईट झिप’ या १० किलो कॉम्पोझिट एलपीजी सिलेंडरचे अहिल्यानगरमध्ये प्रथमच आनंद गॅस एजन्सीच्या वतीने उत्साहात लोकार्पण करण्यात आले. शहरातील नागरिकांना घरगुती स्वयंपाकासाठी हलका, सोयीस्कर आणि आधुनिक एलपीजी पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

नुकत्याच आयोजित विशेष कार्यक्रमात ‘भारत गॅस लाईट झिप’ सिलिंडरचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी सिलिंडरची रचना, वजन, वापरातील सोय तसेच सुरक्षित हाताळणीबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. आनंद गॅस एजन्सीच्या टीमने ग्राहकांना विविध एलपीजी पर्यायांबाबत मार्गदर्शन केले.

पारंपरिक स्टील सिलिंडरच्या तुलनेत भारत गॅस लाईट झिप सिलिंडर ५० टक्क्यांपेक्षा अधिक हलका आहे. त्यामुळे तो उचलणे, वाहून नेणे आणि हाताळणे तुलनेने सोपे होते. त्याची अंशतः पारदर्शक बॉडी असल्यामुळे सिलिंडरमधील शिल्लक गॅसची पातळी ग्राहकांना सहज पाहता येते. कॉम्पोझिट मटेरियलमुळे सिलिंडर गंजमुक्त असून त्याची रचना आधुनिक आणि ग्राहकाभिमुख आहे.

आनंद गॅस एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार सध्या नियमित १४.२ किलोच्या नवीन घरगुती गॅस कनेक्शनची उपलब्धता बंद असताना ग्राहकांसाठी भारत गॅस लाईट झिप हा पर्याय उपलब्ध करण्यात आला आहे. एकटे राहणारे नागरिक, विद्यार्थी, नोकरीनिमित्त स्थलांतरित कर्मचारी, भाड्याच्या घरात राहणारे ग्राहक आणि लहान कुटुंबांसाठी हा पर्याय सोयीचा ठरू शकतो. हा उपक्रम केवळ नवीन सिलिंडरच्या लोकार्पणापुरता मर्यादित नसून, अहिल्यानगरमधील घरगुती एलपीजी वापर अधिक हलका, सुलभ आणि आधुनिक करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असल्याचे आनंद गॅस एजन्सीच्या वतीने सांगण्यात आले.भारत गॅस लाईट झिप सिलिंडर सध्या अहिल्यानगरमध्ये आनंद गॅस एजन्सी येथे उपलब्ध आहे. याप्रसंगी दिव्या जावळे, वैशाली दिकोंडा, सरिता अंदे, रुचिता धाडगे, सुनयना नंबियार, सागर तरटे, विशाल पोंदे आदी उपस्थित होते.


हरिनाम सप्ताहात मोफत नेत्र तपासणी करताना डॉक्टर.

# हरिनाम सप्ताहात मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया

नगर – ग्रामीण भागातील वाडी-वस्तीवरील नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने जिल्हाभर मोफत नेत्र तपासणी शिबिरे राबविणाऱ्या पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्थेच्या वतीने आंबेवाडी पावन गणपती (ता. पाथर्डी) येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तपासणीदरम्यान मोतिबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या गरजू रुग्णांवर पुणे येथे केली जाणार आहे.

कै. सुखदेव माधवराव वेताळ यांच्या स्मरणार्थ या आरोग्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष मेजर शिवाजी वेताळ व सुभेदार मेजर संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविक व ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्रविकार असलेल्या रुग्णांना आवश्यक उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तपासणीत मोतिबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांची नोंद करून पुढील उपचाराची व्यवस्था करण्यात येणार आहे. डॉ. कोरडे यांनी ग्रामस्थांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करताना डोळ्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, नेत्रविकारांची लक्षणे कोणती, नियमित नेत्र तपासणीचे महत्त्व काय आहे, याबाबत माहिती दिली. यावेळी मयुर चव्हाण, अनिल चव्हाण, दिलीप राठोड, अंबादास चव्हाण, संजय चव्हाण, विमल चव्हाण, लीलाबाई चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते. सूत्रसंचालन उषाताई राठोड यांनी केले. अनिता शिवाजी वेताळ यांनी आभार मानले.



माथणी शाळेतील विद्यार्थ्यांच्या राख्या जवानांसाठी पाठविताना विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालक.

# माथणी शाळेतील विद्यार्थ्यांनी सैनिकांसाठी पाठवल्या राख्या

नगर – अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त देशाचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या जवानांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सैनिकांना राख्या पाठवल्या.

एक राखी देशसेवेसाठी हा उपक्रम शाळेत राबवण्यात आला. आपल्या कुटुंबापासून दूर राहून रात्रंदिवस देश रक्षण करणाऱ्या जवानांना या पवित्र सणाचा आनंद मिळावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांनी स्वतः अनेक राख्या तयार केल्या. पहिली राखी त्या हाताला बांधू या जो बहिणीच्या रक्षणासाठी देशाचे रक्षण करतो. या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात कृतीशील सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना शाळेतील उपक्रम शिक्षक सुनील अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी भारतीय टपाल विभागाने जवानांना राख्या पाठवण्यासाठी मदत केली. या राख्या जवानांना पोस्टाद्वारे पाठवण्यात आल्या. तसेच शाळेत सैनिकांना निमंत्रित करून त्यांना राख्या बांधण्यात आल्या. यावेळी सैनिकांनी विद्यार्थ्यांना देशभक्ती बाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधीर घोरपडे, शिक्षक सुनील अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी जवानांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पालक विवेक घोरपडे उपस्थित होते.

# दिन दुबळयांची सेवा करत राष्ट्र उन्नतीकरीता जात धर्म न पाहता काम करा

### गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे प्रतिपादन; 'जखमांतून जन्मलेले सामर्थ्य' पुस्तकाचे देवगड येथे प्रकाशन


ज्येष्ठ पत्रकार विजय हरिचंद गांधी यांच्या जीवन चरित्राचा आढावा घेणाऱ्या जखमांतून जन्मलेले सामर्थ्य पुस्तकाचे प्रकाशन करताना गुरुवर्य भास्करगिरी महाराज व मान्यवर.

नेवासा – नेवासा येथील जेष्ठ पत्रकार विजय हरिचंद गांधी यांच्या जीवन चरित्राचा आढावा घेणाऱ्या जखमांतून जन्मलेले सामर्थ्य या पत्रकार बाळासाहेब तनपुरे लिखित पुस्तकाचे प्रकाशन श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत श्री भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते देवगड येथील कल्याण सभागृहात करण्यात आले. दिन दुबळयांची सेवा करत राष्ट्र उन्नतीकरीता जात धर्म न पाहता काम करा असे आवाहन गुरुवर्य भास्करगिरी महाराजांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या प्रकाशन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग हे होते तर नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, माजी आमदार बाळासाहेब मुरकटे, जेष्ठ नेते काशिनाथ नवले, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा, नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, सत्कार मूर्ती जेष्ठ पत्रकार विजय गांधी, सौ.कांचनमाला गांधी, रामभाऊ जगताप, श्रीरामपूर येथील जेष्ठ विधी तज्ञ ॲड.शशिकांत गांधी, अहिल्यानगरचे जेष्ठ सी.ए.अशोक पितळे, नामदेव महाराज कंधारकर, सूर्यकांत गांधी, राजेंद्र मुथ्था, अभिजित गांधी व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी सभापती नंदकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. पुस्तकाचे लेखक जेष्ठ पत्रकार बाळासाहेब तनपूरे यांनी विजय गांधी यांच्या जीवनकार्याचा आढावा सादर केला.

यावेळी बोलताना गुरुवर्य श्री भास्करगिरी महाराज म्हणाले की जेष्ठ पत्रकार विजय गांधी यांनी आपल्या जीवनाची वाटचाल संतांच्या संगतीत राहून केली. प्रत्येक झालेल्या धार्मिक कार्यात त्यांचा सहभाग मोलाचा ठरला त्यांची जीवनाची वाटचाल खडतर झाली असली तरी आईवडीलांचे आशीर्वाद घेऊन संत आनंदऋषीजी महाराजांच्या सेवेने त्यांनी जीवनाची वाटचाल केली. ७९ वर्षाच्या प्रवासात संत विचारांच्या प्रभावामुळे त्यांनी अनेक संकटे जीवनात पार केली.जीवन हे सुखदुःख मिश्रित असते, दुःखात साथ देणाऱ्याना तर शेवटच्या श्वासापर्यंत आपण विसरू शकत नाही त्याच प्रमाणे गांधी यांना जिवलग मित्रांची साथ मिळाली असल्याचे सांगत त्यांनी विजय गांधी यांच्या दीर्घायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे व माजी आमदार पांडुरंग अभंग यांचे जीवनकार्याचा मागोवा घेत शुभेच्छा दिल्या.

यावेळी झालेल्या पुस्तक प्रकाशन सोहळयाच्या प्रसंगी जेष्ठ व्यापारी अशोकलाल बोरा, पुणे येथील उद्योजक रविंद्र मुनोत, माजी सभापती शंकरराव लोखंडे, अजितदादा पवार शिक्षण संस्थेचे संचालक दिलीपराव पवार, नगरसेवक निरंजन डहाळे, पुस्तक प्रकाशन कमिटीचे बाबुराव उपाध्ये, भागवतराव मुठे, प्रा.शिवाजी बारगळ, प्रा.रामचंद्र राऊत,कृष्णा माळवे, डॉ.राजेंद्र शिर्के, इंजिनिअर सुनीलराव वाघ, सुभाष कडू, सतीश मुळे, शंकरराव ओहोळ, अंबादास इरले, अभय गुगळे, सागर गांधी यांच्यासह विजय गांधी परिवारातील नातेवाईक मंडळी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पत्रकार अशोक डहाळे यांनी सूत्रसंचालन केले तर अभिजित गांधी यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हभप सौ.साधनाताई मुळे यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



शिववरद प्रतिष्ठानच्या वतीने आनंदी बाजार येथील महिला गार्डनमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिरात भक्तिभावाने शिवेश्वर महादेवाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

# आनंदी बाजारातील महिला उद्यानातील मंदिरात शिवेश्वर महादेवाची प्राणप्रतिष्ठाणा

नगर – आनंदी बाजार परिसरातील महिला गार्डनमध्ये शिववरद प्रतिष्ठानच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिरात भक्तिभावाने शिवेश्वर महादेवाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. मनपाचे माजी सभापती किशोर डागवाले यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या या नव्या महादेव मंदिरात हर हर महादेवच्या जयघोषात शिवेश्वर महादेवाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला. या सोहळ्याआधी शिवेश्वर महादेव पिंडीची व नंदीची सजवलेल्या रथातून वाजत गाजत आनंदी बाजार परिसरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

दोन दिवस चालेल्या शिवेश्वर महादेवाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात माजी सभापती किशोर डागवाले, नगरसेविका आशा डागवाले, शिववरद प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर गोरे, महिला मंडळाच्या अध्यक्षा आरती आढाव, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष राजेंद्र देव यांच्या मार्गदर्शनाखाली होमहवन व सर्व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर शेकडो भाविकांच्या उपस्थित महाआरती करण्यात आली. परिसरातील ११ यजमान दांपत्यांनी विधीवत पूजेच्या सर्व धार्मिक विधी केल्या. वृद्धेश्वरच्या दीपक बिरादार महाराज यांच्या हस्ते मंदिराचे कळसारोहण झाले.

मंदिराच्या उभारणीसाठी विनय बुरा, नीता बुरा, आरती आढाव, बबनराव आढाव, उज्वला भांगे, ज्ञानदेव भांगे, शिल्पा गणगले, कैलास दिकोंडा व सुनील डहाळे आदींनी सहकार्य केले. या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, डॉ.हेमंत देशपांडे, हिराकांत रामदासी, नगरसेवक गणेश कवडे, ॲड.महेश तवले, संतोष गेनाप्पा, प्रा.माणिकराव विधाते, पै. मनोज लोंढे, बाळासाहेब भुजबळ, रेनुल गवळी, रीकिता गवळी, प्रतिष्ठानचे सचिव रोहन डागवाले, कार्याध्यक्ष ॲड. सुनील सूर्यवंशी, सचिन भिंगारकर, यश डागवाले, सुभाष दारवेकर आदींसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

किशोर डागवाले म्हणाले, आनंदी बाजार परिसरातील महिला गार्डनमध्ये महिलांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्वांनी केलेल्या मोलाच्या मदतीमुळे येथे केवळ २१ दिवसात शिवेश्वर महादेव मंदिराची उभारणी झाली आहे. महिला गार्डनच्या माध्यमातून आता परिसरातील महिलांना चांगल्या सुधृढ आरोग्याच्या शक्ती बरोबरच महादेवाच्या भक्तीची पर्वणीही मिळणार आहे. त्यामुळे एकेकाळी अतिक्रमणामुळे दुर्लक्षित असलेल्या या जागेचा शिवमंदिर उभारल्यामुळे सदुपयोग झाला असून परिसराच्या वैभवात भर पडली आहे. या मंदिरासाठी सर्वांनी खूप मोलाची मदत केल्याने कमी वेळेत उभारणी झाली.

# शेतामध्ये आढळलेले मांडूळ सुरक्षित पकडून सर्पमित्राने केले निसर्गाच्या सान्निध्यात मुक्त




सर्पमित्र कृष्णा बेरड यांनी पकडलेले मांडूळ निसर्गात मुक्त केले.

नगर – मांडूळ साप लाखो–कोटी रुपयांना विकला जातो, अशा अफवांमुळे नेहमीच चर्चेत असलेला चार ते पाच किलो वजनाचा मांडूळ साप शहापूर–कर्डीले पंपासमोरील शेतात आढळून आल्याने परिसरात काही काळ खळबळ उडाली. सकाळच्या सुमारास शेतात खुरपणीचे काम सुरू असताना शेतकऱ्यांच्या निदर्शनास हा साप आला.

अचानक साप दिसल्याने घाबरलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झालेल्या पाटील यांनी कोणतीही इजा न करता मांडूळ सापाला सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर त्याला योग्य नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. यावेळी आनंद दळवी, प्रवीण लाटणे, पवन दारांगे, अथर्व पुंड आदी उपस्थित होते.

मांडूळ सापाबाबत समाजात अनेक वर्षांपासून विविध गैरसमज व आर्थिक व्यवहाराच्या अफवा पसरलेल्या आहेत. मात्र, अशा अफवांवर विश्वास ठेवून साप पकडणे, त्याला इजा करणे किंवा त्याची विक्री करण्याचा प्रयत्न करणे धोकादायक तसेच कायद्याच्या कचाट्यात आणणारे ठरू शकते. साप आढळल्यास नागरिकांनी घाबरून जाऊ नये, त्याला मारू नये किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. सापाला सुरक्षित अंतरावर ठेवून सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी केले.

# बालरंगभूमी परिषद आणि कलारंगतर्फे गणेशमूर्ती बनवा कार्यशाळेचे आयोजन

नगर – सणांचा रंग, परंपरेचा वारसा आणि कलात्मकतेची नाळ मुलांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करणाऱ्या बालरंगभूमी परिषदेच्यावतीने यंदा गणेशोत्सवानिमित्त गणेशमूर्ती बनवा कार्याशाळा आयोजित करण्यात आली आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग असून अलीकडेच त्याला राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आले आहे. पर्यावरणपूरकतेचा संदेश देणाऱ्या गणेशोत्सवाची तयारी आता अधिक अर्थपूर्ण आणि सर्जनशील बनवण्याचा प्रयत्न बालरंगभूमीची अहिल्यानगर शाखा व कलारंग संयुक्तरित्या करत आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना शाडू मातीपासून आपला गणपती स्वतः तयार करण्याची संधी मिळणार असून, कार्यशाळेतून तयार झालेल्या मूर्ती घरी बसविण्याचा आनंद मिळणार आहे, असे अहिल्यानगरचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी सांगितले. कलात्मकतेसोबतच पर्यावरणाची जबाबदारी घेणारे उद्याचे नागरिक घडवणे हाच या उपक्रमामागचा खरा हेतू आहे.

यावेळी पारंपरिक मूर्ती घडवण्याच्या प्रक्रियेबरोबरच रंगकाम व सजावटीचे बारकावे देखील शिकवले जातील, असे कलारंगच्या संचालिका आणि परिषदेच्या उपाध्यक्ष सुजाता पायमोडे यांनी सांगितले. कार्यशाळेसाठी २०० रुपये प्रवेश शुल्क असून शाडू माती आयोजक पुरवणार आहेत. यासाठी घरून येताना पाट किंवा फळी बरोबर ठेवावी. ही कार्यशाळा ६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता कमलाबाई नवले हॉल, गुलमोहर रोड येथे होणार असून, इच्छुकांनी ९८५०१७७०४२ किंवा ९२२५३१६६१५ या संपर्क क्रमांकावर पूर्वनोंदणी करून कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# होमिओपॅथी संशोधनाला नवी दिशा, नॅनो टेक्नॉलॉजी तज्ज्ञ डॉ. किशोर पाकणीकर यांचे मार्गदर्शन





होमिओपॅथीच्या क्षेत्रात Evidence-Based Research ला चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या व्हायटल होमिओपॅथिक फोरम, अहिल्यानगरच्या संशोधन उपक्रमांना नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ. किशोर पाकणीकर यांचे महत्त्वपूर्ण वैज्ञानिक मार्गदर्शन लाभले.

कोपरगाव – होमिओपॅथीच्या क्षेत्रात Evidence-Based Research ला चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या व्हायटल होमिओपॅथिक फोरम, अहिल्यानगरच्या संशोधन उपक्रमांना नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ व पंतप्रधान नियुक्त प्राध्यापक डॉ. किशोर पाकणीकर यांचे महत्त्वपूर्ण वैज्ञानिक मार्गदर्शन लाभले.

३० ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथे डॉ. किशोर पाकणीकर यांच्यासोबत व्हायटल होमिओपॅथिक फोरमच्या पदाधिकाऱ्यांची प्रदीर्घ बैठक झाली. यावेळी फोरमच्या माध्यमातून होमिओपॅथीमध्ये सुरू असलेल्या विविध संशोधन प्रकल्पांचा, त्यातील प्रगतीचा तसेच संशोधन प्रक्रियेत येणाऱ्या विविध वैज्ञानिक व तांत्रिक अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

व्हायटल होमिओपॅथिक फोरमच्या माध्यमातून होमिओपॅथीतील शास्त्रीय संशोधनाला सातत्याने चालना दिली जात आहे. या उपक्रमांतर्गत CCRH, नवी दिल्लीच्या माध्यमातून सोरायसिस, PCOS, Auto-immune diseases, फंगल इन्फेक्शन तसेच विविध त्वचारोगांवरील १२ संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. याशिवाय संधिवात, पचनसंस्थेचे विकार, थायरॉईड आदी विषयांवरील संशोधन कार्यही प्रगतिपथावर असून, संबंधित संशोधन पेपर लवकरच सादर करण्यात येणार आहेत. फोरमच्या संशोधन कार्यातील विशेष उल्लेखनीय कामगिरी म्हणजे मागील वर्षी कठोरा, बुलढाणा येथे केस गळती अर्थात Alopecia या समस्येवरील यशस्वी होमिओपॅथिक उपचाराचे करण्यात आलेले शास्त्रीय संशोधन. या संशोधनातून नोंदविण्यात आलेले परिणाम आशादायी असून, केस गळतीवरील हे संशोधन CCRH, नवी दिल्लीकडे सादर करण्यात आले आहे.

बैठकीदरम्यान डॉ. पाकणीकर यांनी फोरमच्या सुरू असलेल्या संशोधन कार्याचे बारकाईने परीक्षण करून विविध बाबींवर मौल्यवान वैज्ञानिक मार्गदर्शन केले. भविष्यातील संशोधन अधिक शास्त्रीय, वस्तुनिष्ठ आणि Evidence- Based पद्धतीने पुढे नेण्यासाठी आवश्यक ते सहकार्य, मार्गदर्शन व वैज्ञानिक मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

होमिओपॅथीतील दीर्घकाळच्या क्लिनिकल अनुभवांना आधुनिक वैज्ञानिक संशोधनाची जोड देऊन त्यांचे शास्त्रीय दस्तऐवजीकरण, विश्लेषण आणि प्रमाणीकरण करण्याच्या दिशेने ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. होमिओपॅथीच्या संशोधनाला आंतरशाखीय वैज्ञानिक दृष्टिकोनातून अधिक सक्षम करण्यासाठी या संवादातून नवी दिशा मिळाली आहे.

या बैठकीस पुणे येथील प्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ज्ञ व Scientific dvisory Board, New Delhi चे सदस्य डॉ. संजीव डोळे, व्हायटल होमिओपॅथिक फोरमचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र श्रीमाळी, उपाध्यक्ष डॉ. प्रवीण बिडकर, सचिव डॉ. प्रशांत गंगवाल, सहसचिव डॉ. सोमिनाथ गोपाळघरे, तसेच डॉ. रियाज पटेल, डॉ. आशिष जयस्वाल, डॉ. यश श्रीमाळी, डॉ. भूषण गंगवाल, डॉ. कौस्तुभ वाणी आदी होमिओपॅथिक तज्ज्ञांसह विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. ''संशोधनातून होमिओपॅथीला अधिक भक्कम वैज्ञानिक आधार देणे' या उद्दिष्टाच्या दिशेने व्हायटल होमिओपॅथिक फोरमची वाटचाल सुरू असून, डॉ. किशोर पाकणीकर यांच्यासोबत झालेला हा वैज्ञानिक संवाद या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण आणि आश्वासक टप्पा ठरला आहे.



रिपब्लिकन सेनेच्या जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देताना प्रदेशाध्यक्ष सुशील सूर्यवंशी आणि जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे.

# गाव तिथे रिपब्लिकन सेनेची शाखा उभारण्याचा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्धार

नगर – रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक सक्कर चौक येथील आंबेडकर भवन येथे उत्साहात पार पडली. सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार, प्रदेशाध्यक्ष सुशील सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.

बैठकीत रिपब्लिकन सेनेची जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासह 'गाव तिथे शाखा' उभारण्याचा निर्धार करण्यात आला. तळागाळातील गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न रिपब्लिकन सेनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी नूतन जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. जिल्हा महासचिवपदी दिलीप साळवे, जिल्हा संघटकपदी प्रा. गौतम वाघमारे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी लक्ष्मण साखरे, पारनेर–श्रीगोंदा जिल्हा उपाध्यक्षपदी अशोक जाधव, कर्जत–जामखेड जिल्हा उपाध्यक्षपदी विजय साळवे, तर नगर शहर–नगर तालुका जिल्हा उपाध्यक्षपदी बाळासाहेब वाघमारे यांची निवड करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

राजकारण करत असताना समाजकारणाला पहिले प्राधान्य देणार असून, गोरगरीब व वंचितांच्या प्रश्नांसाठी रिपब्लिकन सेना सातत्याने संघर्ष करेल, असा निर्धार जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी व्यक्त केला.

# भारत भारतीच्या वतीने ब्रह्मर्षी स्वामी विराजानंद कन्या गुरुकुलात रक्षाबंधन उत्सव



भारत भारतीचा रक्षाबंधन उत्सव नुकताच पिंपळगाव कौडा येथील ब्रह्मर्षी स्वामी विराजानंद कन्या गुरुकुलमध्ये साजरा झाला.

नगर – पिंपळगाव कौडा येथील ब्रह्मर्षी स्वामी विराजानंद कन्या गुरुकुलात भारत भारतीच्या वतीने रक्षाबंधन उत्सव उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षणासोबतच शास्त्रोक्त वैदिक ज्ञान, संस्कार आणि भारतीय संस्कृतीची शिकवण देणाऱ्या या गुरुकुलातील ब्रह्मचारिणी कन्यांनी भारत भारतीच्या पदाधिकाऱ्यांना औक्षण करून राखी बांधली.

यावेळी भैय्या मेरे राखी के बंधन को निभाना... या गीताच्या स्वरांनी संपूर्ण वातावरण भावनांनी भारून गेले. छोट्या भगिनीच्या हातून राखी बांधताना उपस्थित बंधूंच्या चेहऱ्यावर आनंद आणि आपुलकीचे भाव उमटले. या भावस्पर्शी क्षणाने उपस्थित अनेकांचे डोळे पाणावले. भारत भारतीच्या बंधूंनी गुरुकुलातील सर्व भगिनी कन्यांना भेटवस्तू देत ओवाळणी दिली. भारत माता की जयच्या जयघोषात कार्यक्रम साजरे झाले.

यावेळी भारत भारतीचे ज्येष्ठ मार्गदर्शक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, प्रदेश उपाध्यक्ष कमलेश भंडारी, अहिल्यानगर अध्यक्ष रमेश रासने, सचिव चंद्रकांत पंडित, माजी अध्यक्ष अशोक मवाळ, ज्येष्ठ सदस्य कृष्णा वाखारे, कॅप्टन अमरसिंग रावत, गुरुकुलच्या आचार्य विदुषी विश्रुती आर्या, आचार्य ऋतज्ञा, गुरुकुलच्या संचालिका राखी वर्मा यांच्यासह गुरुकुलमधील कन्या व पालक उपस्थित होते.

कमलेश भंडारी म्हणाले, ब्रह्मर्षी स्वामी विराजानंद कन्या गुरुकुल सनातन संस्कृती, संस्कार आणि परंपरा जपत नव्या पिढीला वैदिक ज्ञान देऊन घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. या संस्थेच्या नि:स्वार्थ कार्यामागे भारत भारती भक्कमपणे उभी आहे. गुरुकुलातील कन्यांना आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारत भारतीने आश्रमात चार खोल्या बांधून दिल्या आहेत. तसेच दर महिन्याच्या किराणा मालाची जबाबदारीही भारत भारतीच्या सदस्यांनी स्वीकारली आहे. भारताचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी संस्कारक्षम पिढी घडविणाऱ्या या गुरुकुलाच्या कार्याला समाजातील सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही भंडारी यांनी केले. प्रास्ताविकात अशोक मवाळ यांनी भारत भारतीच्या विश्वबंधुत्वाच्या कार्याची माहिती दिली. भाऊ रासने यांनी आभार मानले.

# होमिओपॅथीच्या साथीने मूळ कारणावर मात आणि सकारात्मक जीवनाची नवी वाट

वैद्यकीय तपासणीच्या अहवालात जेव्हा 'कॅन्सर' हा शब्द समोर येतो, तेव्हा केवळ रुग्णाचेच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य एका क्षणात हादरून जाते. मनात एकामागून एक अनेक शंका, वेदनांची भीती आणि भविष्याची अनिश्चितता निर्माण होते. आता पुढे काय? हा एकच प्रश्न कुटुंबातील प्रत्येकाच्या मनात घोळत असतो.

परंतु गेल्या २१ वर्षांच्या सातत्यपूर्ण वैद्यकीय सेवेतून आम्ही हजारो रुग्णांच्या डोळ्यांतील हा तणाव अत्यंत जवळून पाहिला आहे. या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर आम्ही पूर्ण विश्वासाने सांगू इच्छितो की – कॅन्सर म्हणजे जीवनाचा पूर्णविराम नव्हे, तर तो एका नव्या संघर्षाची आणि विजयाची सुरुवात आहे! आजच्या प्रगत वैद्यकीय युगात कॅन्सर हा अजिबात न घाबरण्याजोगा आजार राहिला आहे. योग्य वेळी घेतलेले अचूक निर्णय, वेळेवर सुरू झालेले उपचार आणि कुटुंबाची खंबीर साथ यांच्या बळावर या आजारावर पूर्णपणे मात करता येते.

## मन खंबीर, तर अर्धी लढाई तिथेच जिंकली!

वैद्यकीय शास्त्रात आणि आमच्या २१ वर्षांच्या प्रॅक्टिसमध्ये एक गोष्ट सातत्याने सिद्ध झाली आहे – मला काहीही होणार नाही आणि मी यातून नक्की सुखरूप बाहेर पडणार, हा एक सकारात्मक विचार हजारो औषधांपेक्षाही अधिक वेगाने कार्य करतो. जेव्हा रुग्ण मानसिकदृष्ट्या खंबीर होतो, तेव्हा त्याच्या शरीराची अंतर्भूत रोगप्रतिकारक शक्ती दुप्पट वेगाने काम करू लागते.

मानसिक बळ वाढवण्यासाठी या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भीती दूर सारा आजाराचे नाव ऐकून खचून न जाता, उपचारांच्या दिशेने सकारात्मक पावले टाका. अनावधानाने पसरणाऱ्या अफवांपासून दूर राहा.

इंटरनेट किंवा समाजात पसरणाऱ्या भ्रामक माहितीवर विश्वास न ठेवता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. सकारात्मक सहवास: तुम्हाला धीर देणाऱ्या, प्रोत्साहन देणाऱ्या आणि आनंद देणाऱ्या प्रियजनांच्या संपर्कात राहा.

## होमिओपॅथी कॅन्सरच्या मूळ कारणावर कशी काम करते?

अनेकदा असा प्रश्न विचारला जातो की, होमिओपॅथी कॅन्सरवर नेमकी कशी मात करते? होमिओपॅथी ही केवळ शरीरातील गाठ किंवा लक्षणे दाबण्याचे काम करत नाही, तर आजार निर्माण होण्यामागच्या मूळ कारणावर काम करते.

**१. प्रतिकारशक्तीचा समतोल :** कॅन्सर हा मूलतः शरीरातील पेशींच्या अनियंत्रित वाढीमुळे होतो, जेव्हा शरीराची स्वतःची देखरेख यंत्रणा कमकुवत होते. होमिओपॅथिक औषधे शरीराच्या स्वयंचलित प्रतिकारशक्तीला उत्तेजित करतात, ज्यामुळे शरीर स्वतःहून असामान्य पेशींशी लढण्यास सक्षम होते.

**२. शरीराची नैसर्गिक संतुलन प्रणाली पूर्ववत करणे :** होमिओपॅथीनुसार कोणताही गंभीर आजार हा शरीरातील 'व्हायटल फोर्स' (प्राणशक्ती) बिघडल्यामुळे होतो. होमिओपॅथिक औषधे या प्राणशक्तीला संतुलित करतात, ज्यामुळे आजार निर्माण होणारी शारीरिक सुपीकताच नष्ट होते.

**३. साइड इफेक्टस् कमी करणे आणि वेदनामुक्ती :** पारंपारिक उपचारांदरम्यान (जसे की केमोथेरपी किंवा रेडिएशन) होणारा तीव्र थकवा, मळमळ, भूक न लागणे आणि मानसिक तणाव कमी करून रुग्ण उपचारांना अधिक चांगला प्रतिसाद देईल असे वातावरण शरीरात तयार केले जाते.

होमिओपॅथी डॉक्टर केस हिस्ट्री घेताना कोणती सखोल माहिती विचारतात? होमिओपॅथीमध्ये आजारापेक्षा आजारी माणसावर उपचार केले जातात म्हणूनच, डॉ. बोरा कॅन्सर क्लिनिकमध्ये रुग्णाची अत्यंत बारकाईने आणि सखोल 'केस हिस्ट्री' घेतली जाते.

**डॉक्टर रुग्णाला खालील विशिष्ट आणि सखोल प्रश्न विचारतात : मानसिक आणि भावनिक इतिहास** – आजार सुरू होण्याच्या आधी आयुष्यात काही मोठा मानसिक धक्का, अतिदुःख, भीती, राग किंवा मोठे आर्थिक/वैयक्तिक नुकसान झाले होते का? (होमिओपॅथीनुसार तीव्र मानसिक ताण हा कॅन्सरचा एक प्रमुख ट्रिगर पॉईंट असू शकतो.)

रुग्णाचा स्वभाव कसा आहे? (चिडचिडा, शांत, हळवा, की अंतर्मुख?), २. शारीरिक वैशिष्ट्ये आणि सवयी रुग्णाला उष्णता जास्त सहन होते की थंडी? भूक, तहान, अन्नाची आवड–नावड (उदा. गोड, खारट, किंवा आंबट पदार्थांची विशेष ओढ). झोपेची पद्धत, स्वप्ने आणि घामाचे प्रमाण.

**आजाराचा सखोल इतिहास :** लक्षणे नेमकी कधी, कशी आणि कोणत्या परिस्थितीत वाढतात किंवा कमी होतात? आनुवंशिक इतिहास (कुटुंबामध्ये आधी कोणाला कॅन्सर किंवा इतर गंभीर आजार होते का?).

**जीवनशैली आणि दैनंदिन दिनक्रम :** आहार, व्यसन (तंबाखू, सिगारेट, दारू इत्यादी), कामाचे स्वरूप आणि कामाच्या ठिकाणचे वातावरण. या सर्व सखोल माहितीचे विश्लेषण करून रुग्णासाठी 'कॉन्स्टिट्युशनल औषध' निवडले जाते, जे थेट रुग्णाच्या मूळ प्रकृतीवर आणि आजाराच्या मूळ कारणावर कार्य करते.

## काळजी आणि योग्य आहाराची जोड

**कॅन्सरच्या उपचारांदरम्यान रुग्णाची शारीरिक ताकद टिकवून ठेवणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते : पौष्टिक व सुपाच्य आहार :** ताजी फळे, भाज्या, प्रथिने आणि खनिजांचा आहारात समावेश करा.

**पुरेसे पाणी :** शरीरातील विषारी घटक बाहेर पडण्यासाठी भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ घ्या.

**कौटुंबिक साथ :** घरातील वातावरण नेहमी भयमुक्त आणि उत्साही ठेवा. कुटुंबाचे प्रेम ही रुग्णासाठी सर्वात मोठी ताकद असते.

कॅन्सरच्या सावटातून बाहेर पडून पुन्हा एकदा निरोगी, आनंदी आणि भयमुक्त आयुष्य जगणे पूर्णपणे शक्य आहे. गेल्या २१ वर्षांत आम्ही अशा हजारो योद्ध्यांना पाहिले आहे ज्यांनी आपल्या जिद्दीच्या आणि योग्य उपचारांच्या बळावर कॅन्सरवर मात केली आहे.

**वैद्यकीय संदेश : सावध राहा आणि वेळेवर निदान करा :** शरीरातील कोणत्याही असामान्य बदलांकडे दुर्लक्ष करू नका.

**जिद्द बाळगा :** तुम्ही एक योद्धा आहात. हा आजार तुमच्या इच्छाशक्तीपेक्षा मोठा अजिबात नाही.

**विश्वास ठेवा :** योग्य उपचारपद्धती आणि स्वतःच्या शरीराच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास ठेवा. चला, आजच मनातील सर्व भीती दूर फेकून देऊया, सकारात्मकतेचा स्वीकार करूया आणि आत्मविश्वासाने निरोगी आयुष्याकडे पाऊल टाकूया! डॉ. बोरा कॅन्सर क्लिनिक – २१ वर्षांचा प्रदीर्घ विश्वास आणि सखोल होमिओपॅथी उपचार.

**आमचा संकल्प :** प्रत्येक रुग्ण पुन्हा एकदा आपल्या कुटुंबात आनंदाने, उत्साहाने आणि सन्मानाने वावरावा!

**– डॉ. सचिन बोरा** (होमिओपथी तज्ञ)
डॉ. बोरा कॅन्सर क्लिनिक, अंबर प्लाझा,
माळीवाडा बस सॅण्ड समोर, अहिल्यानगर.
अधिक माहितीसाठी संपर्क ९९२१६४६५८८

# शिव्यांमध्ये दिल्लीकर आघाडीवर

शिव्या हा कोणत्याही भाषेचा अविभाज्य भाग असतो, असे भाषाविषयक तज्ज्ञ म्हणतात. अर्थात शिव्या देणे वाईटच आहे. मात्र शिव्यांच्या व्युपत्तीपासून त्या कशा बदलत गेल्या, यासंदर्भातील अभ्यास अनेक भाषा तज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे. मन मोकळे करण्यासाठी, राग व्यक्त करण्यासाठी तोंडून अपशब्द निघतो, असे शिव्या देणारे सहज मान्य करतात. शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे.

भारतातील कोणत्या राज्यात सर्वाधिक शिव्या दिल्या जातात, या प्रश्नाचे उत्तर दिल्ली असे आहे. दिल्लीतील लोक सर्वात जास्त अपशब्द वापरतात, असे एका सर्वेक्षण अहवालात असे दिसून आले आहे. आया-बहिणींवरुन शिव्या आणि मुलींना लक्ष्य करणारे अपशब्द राजधानीत सर्वात साम ान्यपणे वापरले जातात. सर्वेक्षणानुसार दिल्लीतील ८० टक्के लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात अपशब्द वापरतात. 'सेल्फी विथ डॉटर फाउंडेशन'चे संस्थापक आणि महर्षी दयानंद विद्यापीठातील प्रॅक्टिसचे प्राध्यापक डॉ. सुनील जगलान यांनी 'गाली बंद घर अभियान' सुरू केले आणि या




उपक्रमाचा एक भाग म्हणून वेगवेगळ्या राज्यांमध्ये दीर्घकालीन सर्वेक्षण करण्यात आले. ११ वर्षांच्या कालावधीत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात ७० हजार लोकांकडून प्रतिसाद नोंदवण्यात आला. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या लोकांमध्ये वेगवेगळ्या समाजिक स्तरांतील प्रतिनिधी होते. तरुण, पालक, शिक्षक, डॉक्टर, ऑटो चालक, शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलिस, वकील, व्यापारी, स्वच्छता कर्मचारी, प्राध्यापक आणि पंचायत सदस्य यांचा समावेश होता.

सर्वाधिक शिव्या देणाऱ्या राज्यांमध्ये पंजाब दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाबमधील ७८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरल्याचे मान्य केले आहे. उत्तर प्रदेश (यूपी) आणि बिहार प्रत्येकी ७४ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले. राजस्थानमधील ६८ टक्के आणि हरियाणा ६२ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले. महाराष्ट्रातील ५८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले आहे. या यादीत महाराष्ट्र सातव्या स्थानावर आहे. त्याखालोखाल गुजरातमधील ५५ टक्के लोकांनी अपशब्द वापरतो असे मान्य केले आहे. मध्य प्रदेशमधील ४८ टक्के आणि उत्तराखंड ४५ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले आहे.

सर्वात कमी शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये जम्मू आणि काश्मीर सर्वात खालच्या क्रमांकावर आहे. येथील फक्त १५ टक्के लोकांनी अपशब्द वापरल्याचे सांगितले आहे.

## कॅलिडोस्कोप



# इंग्रज बनला 'शाही तुकडा' फॅन!

भारतीय जेवणाची आवड परदेशी लोकांसाठी नवीन नाही. येथील चव गोऱ्या लोकांच्या जिभेवरही रेंगाळते. पण पहिल्यांदाच शाही तुकडा खाण्यासाठी एक परदेशी व्यक्ती सुरुवातीला संकोच करत होती. त्याला त्याची चव कशी असेल हे माहीत नव्हते. पण त्याने तो खाल्ला तेव्हा त्याने आनंदाने उड्यचा मारल्या. दिल्लीच्या बाजारात फिरत असताना त्याची नजर एका मोठ्या थाळीत सजवलेल्या शाही तुकड्यावर पडली. त्याने प्रथम दुकानदाराकडून त्याचे नाव आणि दर निश्चित केला. दुकानदाराकडून शाही तुकडा घेऊन तो रेस्टॉरंटमध्ये गेला. रील करण्यासाठी कॅमेरा सुरू करून तो म्हणतो, माझ्याशिवाय या छोट्या रेस्टॉरंटमध्ये कोणीच नाही. शाही तुकड्याचा वास घेतल्यानंतर तो एक विचित्र प्रतिक्रिया देतो. त्याचा छोटा तुकडा घेतो आणि त्याची चव चांगली नसेल असे समजून जिभेवर ठेवतो. प्रत्यक्षात जिभेवर तो तुकडा ठेवल्यानंतर त्याचा मूडच बदलला. तो आनंदाने उड्या मारायला लागला. तो म्हणाला, यापेक्षा जगात दुसरे काहीही चांगले असू शकत नाही. मी याला १० पैकी १० गुण देईन. यानंतर तो पटकन ते संपवून तिथून निघून जातो. शाही तुकडा एक गोड पदार्थ आहे. तो ब्रेड, क्रीम आणि देशी तूप वापरून बनवला जातो.



# लोखंडाशिवाय बांधलं मंदिर

हरयाणातल्या अंबाला सिटीतल्या गीतानगरीमध्ये अनोख्या जैन मंदिराची उभारणी सुरू आहे. जैन मुनी विजय इंद्रदिन्न सुरिश्वर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हे मंदिर उभारलं जात आहे. या मंदिराचा आकार गोल असेल. हे मंदिर बांधण्यासाठी संगमरवराचा वापर केला जात आहे. या मंदिराच्या उभारणीत लोखंडाचा अजिबात वापर झालेला नाही. लोखंडाचा एखादा खिळाही ठोकण्यात आलेला नाही. अशा प्रकारचं हे उत्तर भारतातलं पहिलंच मंदिर आहे. २०११ मध्ये या मंदिराच्या उभारणीला सुरुवात करण्यात आली. या मंदिराचा नकाशा कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञाने नाही तर खुद्द जैन मुनी विजय रत्नाकर सुरिश्वर यांनी तयार केला आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार हे मंदिर बांधलं जात आहे. या मंदिराचं बांधकाम जैन स्थापत्यशैलीत केलं जात आहे. संगमरवरावरचं नक्षीकाम राजस्थानमध्ये केलं जात आहे. असं हे अनोखं जैन मंदिर अंबालाची शान ठरणार आहे.



# असा हा नेपच्यून

आपली सूर्यमाला अनेक रहस्यांनी भरलेली आहे. पृथ्वी हा सौरमालेतला तिसरा ग्रह. या पृथ्वीवरच जीवसृष्टी बहरली, फुलली. माणसाला मंगळ ग्रहाचं प्रचंड आकर्षण आहे. मंगळावर जीवसृष्टीचं अस्तित्व आहे का, याचा शोध सुरू आहे. आपल्या सौरमालेतल्या चार ग्रहांवर दगड, माती नाही तर वायू आहेत. म्हणूनच हे ग्रह खूप धोकादायक मानले जातात. नेपच्युन, गुरू, शनी आणि युरेनस असे हे चार ग्रह आहेत. नेपच्यून हा ग्रह पृथ्वीपासून खूप लांब आहे. तसंच तो धोकादायकही आहे. या ग्रहावरचं तापमान उणे २०० इतकं असतं. म्हणजे या ग्रहावर जाण्याचा विचारही आपण करू शकणार नाही. २३ सप्टेंबर १८४६ रोजी या दिवशी नेपच्यूनला पहिल्यांदाच दुर्बिणीतून पाहिलं गेलं. या ग्रहाला नेपच्यून हे नाव देण्यात आलं. या ग्रहाच्या अस्तित्वाच्या शक्यता त्याच्या शोध लागण्याआधीच व्यक्त करण्यात आल्या होत्या.

नेपच्यून हे रोमन देवतेचं नाव आहे. नेपच्यूनवर मिथेन वायूपासून तयार झालेले ढग आहेत. इथे हवा खूप वेगाने वाहते. इथले वारे १५०० मैल प्रति तास एवढ्या वेगाने वाहतात. नेपच्यूच्या वातावरणात कार्बनचं प्रमाण बरंच जास्त असल्यामुळे इथे हिऱ्यांचा पाऊस पडतो. असा हा नेपच्यून सर्वार्थाने अनोखा आहे.



# जेव्हा पुरुष नेसतात साडी...

भारतातील विविध मंदिरांशी अनेक वैशिष्ट्यपूर्ण आणि आश्चर्यकारक परंपरा जोडलेल्या आहेत. त्यापैकी केरळमधील कोट्टनकुलंगरा देवी मंदिराची परंपरा विशेष लक्ष वेधून घेणारी आहे. या मंदिरात देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या पुरुषांना नेहमीच्या कपड्यांमध्ये प्रवेश मिळत नाही. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी त्यांना महिलांप्रमाणे साडी नेसावी लागते आणि सोळा शृंगार करूनच देवीचे दर्शन घ्यावे लागते.

कोट्टनकुलंगरा देवी मंदिरात दरवर्षी 'चामयाविलक्कु' हा प्रसिद्ध धार्मिक उत्सव साजरा केला जातो. या उत्सवात सहभागी होण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो पुरुष भाविक येथे येतात. मंदिराच्या परंपरेनुसार कोणत्याही पुरुषाला पँट-शर्ट, कुर्ता किंवा इतर नेहमीच्या पोशाखात मंदिरात प्रवेश दिला जात नाही. दर्शनासाठी प्रत्येक पुरुषाने महिलांप्रमाणे साडी परिधान करणे आवश्यक असते. त्याचबरोबर चेहऱ्यावर मेकअप, हातात बांगड्या, केसांमध्ये गजरा आणि इतर पारंपरिक दागिने परिधान करूनच देवीसमोर उपस्थित राहावे लागते.

उत्सवादरम्यान मोठ्या संख्येने भाविक येत असल्याने मंदिराबाहेर विशेष व्यवस्था केली जाते. तात्पुरते ब्युटी पार्लर आणि मेकअप स्टॉल उभारले जातात. येथे व्यावसायिक मेकअप आर्टिस्ट पुरुषांना साडी नेसवण्यापासून ते संपूर्ण पारंपरिक शृंगार करण्यापर्यंत मदत करतात. भाविकही कोणताही संकोच न बाळगता श्रद्धेने ही परंपरा पाळतात आणि देवीच्या दर्शनासाठी सज्ज होतात. या अनोख्या प्रथेच्या मागे एक जुनी लोककथा सांगितली जाते. स्थानिक म ान्यतेनुसार, अनेक वर्षांपूर्वी काही गुराखी मुले खेळताना मुलींचे कपडे परिधान करून देवीची पूजा करत होती. त्यांच्या निरागस भक्तीने प्रसन्न होऊन देवीने त्यांना साक्षात दर्शन दिले. तेव्हापासून पुरुषांनी महिलांच्या वेशात देवीची पूजा करण्याची ही परंपरा सुरू झाली असे मानले जाते. स्थानिक श्रद्धेनुसार देवीला हा भक्तिभाव अत्यंत प्रिय आहे.

या मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या अनेक भाविकांचा विश्वास आहे, की,महिलांच्या वेशात आणि संपूर्ण श्रद्धेने देवीचे दर्शन घेतल्यास मनोकामना पूर्ण होतात. चांगली नोकरी, आरोग्य, कुटुंबातील सुख-शांती किंवा इतर कोणतीही इच्छा देवी पूर्ण करते अशी भाविकांची श्रद्धा आहे. याच श्रद्धेमुळे दरवर्षी या उत्सवात सहभागी होणाऱ्या पुरुषांची संख्या वाढत असल्याचे सांगितले जाते.



# तोफगोळ्यांमुळे गाव झाले प्रसिद्ध

एका व्यक्तीने व्यवसाय सुरू करण्यासाठी एक जमीन साफ करण्याचे काम हाती घेतले होते. ही जमीन खोदत असताना त्या व्यक्तीला तिथे १६० वर्ष जुने तब्बल २०० हून अधिक तोफेचे गोळे आढळून आले आहेत. हे तोफगोळे १६० वर्षांपूर्वी झालेल्या गृह युद्धातील असावेत असा अंदाज इतिहास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. ही घटना मिसिसिपीमधील आहे.

जमीन खणण्याचे काम सुरू होते, तेव्हा तिथे आधी दहा ते पंधरा तोफेगोळे आढळून आले. त्यानंतर त्या परिसरात मेटल डिटेक्टरच्या मदतीने शोध घेतला असता, या जमिनीत पाच, दहा नाही, तर तब्बल दोनशे तोफेगोळे आणि काही शस्त्रे आढळून आली आहेत. त्यामुळे संपूर्ण गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. हे तोफेचे गोळे पाहून इतिहास तज्ज्ञांनादेखील आश्चर्याचा धक्का बसला आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी, की ही घटना अमेरिकेतल्या मिसिसिपी प्रांतामधील बूनविले गावातील आहे. हेरोल्ड नाईट असे या व्यक्तीचे नाव आहे. या गावात हेरोल्ड नाईट नावाच्या व्यक्तीची जम ीन आहे. तिथे व्यवसाय सुरू करायचा म्हणून तो त्या जमिनीची सफाई करत होता. खोदकाम सुरू असतानाच त्याला आश्चर्याचा धक्का बसला कारण त्या जमिनीमधून तोफ गोळे वर येण्यास सुरुवात झाली, पाच नाही दहा नाही तर तब्बल २०० तोफ गोळे या ठिकाणी आढळून आले आहेत, तसेच तिथेच काही शस्त्रेदेखील आढळून आली आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची गावात जोरदार चर्चा सुरू झाली. सोबतच गावामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर याची माहिती इतिहासतज्ज्ञांना देण्यात आली, त्यांना देखील आश्चर्याचा धक्का बसला. एखाद्या ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात तोफ गोळे आढळून येणे ही पहिलीच घटना आहे.

हे तोफे गोळे १६० वर्ष जुने, गृह युद्धातील असावेत असा अंदाज या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आला आहे. सध्या हे तोफ गोळे स्वच्छ करून, सुरक्षित स्थळी ठेवण्यात आले आहेत, त्याबद्दल अधिक अभ्यास आणि संशोधन सुरू आहे. दरम्यान, या गावात हे तोफ गोळे सापडल्यामुळे हे गाव एका रात्रीत प्रसिद्ध झाले आहे, हे गाव पहाण्यासाठी व्हीआयपी लोकांची रांग लागली आहे.



# भेट क्षणभराची; आठवण कायमची!

कामाचा ताण, सततच्या बैठका आणि प्रवास यामुळे अनेकांना आपल्या जोडीदारासाठी पुरेसा वेळ देता येत नाही; मात्र वेळ कमी असला, तरी नात्यातील जिव्हाळा कायम ठेवता येतो, हे 'येस मॅडम' चे सह-संस्थापक आणि 'सीईओ' आदित्य आर्य यांनी नुकत्याच शेअर केलेल्या अनुभवातून दिसून आले. त्यांच्या या पोस्टची सध्या 'सोशल मीडिया'वर जोरदार चर्चा होत आहे. आदित्य आर्य यांनी 'लिंक्डइन'वर एक फोटो शेअर करत सांगितले, की एका दिवशी ते आणि त्यांची पत्नी गरिमा शर्मा यांच्या फ्लाइट्सची वेळ अशी जुळली, की दोघांना विमानतळावर केवळ दीड मिनिट एकत्र घालवता आले. एकाची फ्लाइट नुकतीच लँड झाली होती, तर दुसऱ्याची उड्डाणासाठी तयारी सुरू होती. या काही क्षणांमध्ये दोघांनी एकमेकांचा हात धरला, काही शब्दांची देवाणघेवाण केली आणि पुन्हा आपापल्या प्रवासाला निघाले. वेळ कमी असला तरी ती भेट त्यांच्यासाठी खूप खास ठरल्याचे आदित्य यांनी पोस्टमध्ये नमूद केले.

आदित्य यांनी विनोदी शैलीत सांगितले, की आता त्यांच्या आयुष्यात पारंपरिक डेट्सपेक्षा विमानतळावरील अशा छोट्या भेटीच जास्त होतात. सततच्या कामाच्या धावपळीत आणि प्रवासात मिळणारे काही क्षणच त्यांच्यासाठी एकमेकांसोबतचा मौल्यवान वेळ ठरतात. पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, की लग्नाच्या वेळी त्यांनी आयुष्य असा वेग घेईल, याची कल्पनाही केली नव्हती; मात्र पती-पत्नीने मिळून व्यवसाय उभारण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या आयुष्याची गती बदलली. 'येस मॅडम'उभारताना प्रत्येक मिनिटाचे महत्त्व त्यांनी जाणले आणि हाच दृष्टिकोन वैयक्तिक आयुष्यातही उपयोगी ठरला. गेली नऊ वर्षे काम आणि नाते या दोन्ही गोष्टींमध्ये समतोल राखण्याचा ते प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.



# अधिकारी महिलेने केले मुंडण

मध्य प्रदेशातील सिंगरौली महापालिकेच्या आयुक्त आणि एमपीपीसीएस अधिकारी सविता प्रधान यांनी संवेदनशीलतेचे वेगळे उदाहरण घालून दिले आहे. कर्करोगावरील उपचारांमुळे केस गमावलेल्या एका चिम ुकलीला आपण एकटी नाही, ही भावना देण्यासाठी त्यांनी स्वतःच मुंडण केले. त्यांच्या या कृतीचे देशभरातून कौतुक होत असून 'सोशल मीडिया'वरही त्याची मोठी चर्चा आहे.

सविता प्रधान यांनी सांगितले, की सौंदर्य हे केसांमध्ये नसून आत्म विश्वासात असते. महिलांनी नेहमीच लांब केस ठेवले पाहिजेत किंवा ठरावीक पद्धतीने दिसले पाहिजे, ही समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यांच्या मते, पुरुषांचे केस गळणे समाज सहज स्वीकारतो; मात्र एखाद्या महिलेचे केस नसतील तर तिच्याकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. ही विचारसरणी बदलली पाहिजे. मुंडण केल्यानंतर काहींनी त्यांना आता कामातून सुटी घेणार का, असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी हसत उत्तर दिले, 'माझे केस ऑफिसचे काम करत नाहीत. त्यामुळे केस नसले म्हणून माझ्या कामावर कोणताही परिणाम होणार नाही. मी नेहमीप्रमाणे माझी जबाबदारी पार पाडत राहीन.' प्रधान यांनी स्वतःच्या आयुष्यातही अनेक अडचणींवर मात करत प्रशासकीय सेवेत स्थान मिळवले आहे. त्यामुळे संघर्ष करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी भावनिक नाते जोडण्याचा प्रयत्न त्या करतात. या प्रसंगानिमित्त त्यांनी लोकांना बाह्य रूपापेक्षा माणुसकी आणि आत्मविश्वासाला महत्त्व देण्याचे आवाहन केले. मुलगा असो किंवा मुलगी; केस असोत किंवा नसोत; त्यावरून कोणाचेही सौंदर्य ठरत नाही. माणूस त्याच्या स्वभावाने, आत्मविश्वासाने आणि कृतीने सुंदर ठरतो, असा संदेश त्यांनी दिला. सविता प्रधान यांच्या या कृतीमुळे केवळ त्या चिमुकलीचे मनोबल वाढले नाही, तर समाजालाही संवेदनशीलता, सहवेदना आणि सकारात्मक विचारांचा महत्त्वाचा संदेश मिळाला.

# ढिगाऱ्यातून प्रकटली चांदीची नाणी!

गुजरात राज्यातील बनासकांठा येथून एका धक्कादायक बातमी उघडकीस आली आहे. पालनपूर येथे मानसरोवर भागात जमा केलेल्या ढीगाऱ्यात अचानक चांदीची नाणी सापडू लागल्याचा दावा केला जात आहे. गुजरात येथील बनासकांठाच्या पालनपूरात एका आश्चर्यकारक घटना घडली आहे. त्यामुळे संपूर्ण शहरातील लोकांच्या उत्सुकता ताणली गेली आहे.

येथील मानसरोवर भागातील एका जुन्या पाडकामाच्या ढिगाऱ्यातून अचानक चांदीची नाणी लोकांना सापडल्याचा दावा केला जात आहे. ही बातमी मि ळाल्यानंतर लोकांनी घटना स्थळी धाव घेतली. पाहाता पाहाता येथे लोकांची मोठी गर्दी जमली. लोकांनी मिळेल त्या वस्तूंच्या सहाय्याने खोदकाम सुरू केले आहे. असे म्हटले जात आहे, की मानसरोवरच्या जवळ एका उजाड जमिनीवर एक दिवसापूर्वी जुने घराच्या किंवा दुकानाचा राडारोडा डम्प करण्यात आला होता. या ढिगाऱ्यातून चांदी नाणी सापडत असल्याचे वावड्या वाऱ्याच्या



वेगाने पसरल्या आणि माहिती मिळले तसे लोक या ठिकाणी चांदीची नाणी शोधायला आले. लोकांनी जागा मिळेल तिथे ढिगाऱ्याचे खोदकाम सुरु केले आहे. ज्या लोकांना ही नाणी मिळाली ते आपल्या सोबत घेऊन निघून गेले आहेत. काही वेळानंतर ही बातमी संपूर्ण पालनपूर शहरात पसरली आणि मोठ्या संख्येने लोक येथे पोहचले. घटनास्थळी लोकांची गर्दी जमू लागली होती. जुनी चांदीची नाणी सापडल्याबद्दल वेग-वेगळ्या चर्चा होत होती; मात्र ही नाणी किती जुनी आहेत आणि कोणत्या काळातील आहेत. त्यांचा सध्या किती भाव आहे या संदर्भात कोणताही अधिकृत दुजारा मि ळालेला नाही.

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे

दि. : २८ ते ०३ सप्टेंबर २०२६

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

टॉक्सिक (हिंदी) SCREEN - 1




08.00 AM 150/-
02.30 PM 250/-
06.00 PM 300/-
10.00 PM 300/-



12.00 PM 100/-

टॉक्सिक (हिंदी) SCREEN - 2




09.00 AM 150/-
01.00 PM 250/-
05.00 PM 300/-
09.00 PM 300/-

**आशा स्क्वेअर**

कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध

कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

---

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : 28 ते ४ सप्टेंबर 2026




ए फेअरी टले फॉर ग्राऊन-अप्स (हिंदी)
08:00 AM 01:40 PM
09:20 AM 03:15 PM
10:00 AM 04:00 PM
11:30 AM 05:20 AM
12:30 AM 07:45 PM
09:00 PM 10:30 PM



स्पाईडर मॅन (हिंदी)
01:00 PM



आवारापन-२ (हिंदी)
08:45 AM
07:45 PM



हनुमान अंश (हिंदी)
04:15 PM
10:00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow | AVAILABLE ON bookmyshow

CONNPLEX SMART THEATRE

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

---

# घर भाड्याने देणे

आगरकर मळा येथे पहिल्या मजल्यावर ३ रुमचे घर भाड्याने देणे.

**9309966925**

---

# फ्लॅट भाड्याने देणे

राजवर्धन पॅलेस बी विंग सारसनगर येथील **2BHK** फ्लॅट भाड्याने देणे आहे.

**9921039990**

---

# घरपोहोच नर्सिंग सेवा

बेडसोर, डायबीटीस न भरणाऱ्या जखमा योग्य पध्दतीने ड्रेसींग व नर्सिंग केअर केली जाईल.

**7028986048**

---

# Vijay Ganga Rural Medical & Research Foundation,

At/ P: -Bhalwani, Tal: -Parner, Dist - Ahilyanagar.
Ph. No: -9421556198, Email. Id: - vijayacollegeofnsg23@gmail.com

## Walk-In-Interview

Walk-in-Interviews for below mentioned post in our Vijaya College of Nursing, Bhalwani, Tal-Parner, Dist- Ahilyanagar are arranged on Monday, 07/9/2026 at 11.00 am,

| Sr. No | post | No of post | Essential Qualification | Experience |
|---|---|---|---|---|
| 1 | Professor cum princial | 01 | M.Sc, (Nursing) | M.Sc, (Nursing) having total 15 years' experience with M.Sc. (Nursing} out of which 10 years teaching experience M.Sc. (Nursing) in collegiate program. Ph.D. (Nursing) is desirable |
| 2 | Professor cum vice | 01 | M.Sc, (Nursing) | M.Sc. (Nursing) total 12 years' experience with M.Sc, (Nursing) out of which 10 years teaching experience after M.Sc. (Nursing) in Collegiate program, Ph.D. (Nursing) is desirable |
| 3 | Professor | 01 | M.Sc, (Nursing) | M.Sc. (Nursing) total 12 years experience with M.Sc. (Nursing) out of which 10 years teaching experience after M.Sc. (Nursing) in collegiate program. Ph.D. (Nursing) is desirable Ph.D. (Nursing) is desirable |
| 4 | Associate Professor | 02 | M.Sc. Nursing | Total 8 years' experience with M.Sc. (Nursing) including 5 years teaching experience out of this 3 year teaching experience after M.Sc. {Nursing} in collegiate program. |
| 5 | Assistant Professor | 03 | M.Sc. Nursing | M.Sc, (Nursing) with total 3 years teaching experience Ph.D (Nursing) is desirable |
| 6 | Tutor | 08-16 | M.sc Nursing B.Sc Nursing | Tutor M. Sc. (Nursing) preferable Experience. B.Sc. (Nursing) P. B. B. Sc. (Nursing) with 1 year experience |

Eligible and interested candidates should bring their application along with resume. Attested copies of testimonials, experience certificates, two passport size colour pho- tographs, and all original documents at the time of interview-meanwhile forward the soft copy of resume to **email-ID: - vijayacollegeofnsg23@gmail.com** two days before the date of interview. **INTERVIEW VENUE: - Vijaya College of Nursing, At/P - Bhalwani, Tal- Parner, Dist- Ahilyanagar**

**Dr. Kiran G. Rohokale**
President

---

# पाहिजेत

मुकुंदनगर येथे मेमसाहब लेडीज टेलर येथे **जेन्टस कारागीर** जागा २

**8983505197**

---

# पाहिजेत

मेडिकल दुकानात MS-CIT/TALLY ज्ञान असलेल्या कॉम्प्युटरराईज बिलींगसाठी विवाहीत महिला (स. १० ते ७)
तसेच
हेल्पर मुले (दु. ४ ते १०)

**शारदा एजन्सी**
जुना बाजार, बुरुडगल्ली, अ. नगर

**9423791712**

---

# लॉण्ड्री कामासाठी हेल्पर पाहिजेत

काटवन खंडोबा रोड, अहिल्यानगर

**7276058836**

---

# पाहिजेत

कमर्शियल शॉपिंग सेंटरसाठी
**स्वीपर : १**
**सिक्युरिटी गार्ड : १**
(लेडीज/जेन्टस्)
(एजंट क्षमस्व)

**9834713989**

---

# पाहिजेत

नामांकित कंपनी विगेन अहिल्यानगर येथे ऑफिस कामासाठी
**मुली पाहिजेत**
(शिक्षण- १२ वी, पदवीधर)
ठिकाण- अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा स्टॅण्ड जवळ, अ. नगर

**7030595325**
**9503541431**

---

# त्वरित पाहिजेत

अहिल्यानगर एमआयडीसीकरीता
**सिक्युरिटी सुपरवायझरसाठी**
जागा ५
लेडिज व जेन्टस प्राधान्य
शिक्षण १२ वी पास, वेळ ८.३० ते ६.३०
-समक्ष भेटणे-

**9834362074**

---

# ड्रायव्हर पाहिजे

आयशर- जितो, क्रिएटा , पिकअप, गाडी करिता ड्रायव्हर पाहिजे

संपर्क
**9921918273**

---

# १४ वे पुण्यस्मरण



यादों की खुशबू
आपके सिखाए
संस्कारों से बनी
आज भी महसूस होती है,
हर पल आप ही हमें
प्रेरित करते रहते हैं।

**स्व. किशनचंद बालाराम बतरा**
स्व. दि. २/९/२०१२

आपकी पावन स्मृतीमें भावपूर्ण श्रध्दांजली...!

* दुःखांकित *

**बतरा परिवार, अ.नगर**

कामदा मशिन टुल्स * फर्म * कामधेनू मशिन अॅण्ड स्पेअर्स्
सावेडी रोड, झोपडी कॅन्टीन, अ. नगर. | औरंगाबाद

कामदा ऑटो राईडर्स (KTM Bikes) अहिल्यानगर
चेतक इलेक्ट्रिक स्कुटर्स सावेडी रोड, अहिल्यानगर
ट्रायम्फ मोटारसायकल्स् अहिल्यानगर

---

# जाहीर नोटीस

क्र.कावि/फौज/एसआर/१३२/२०२६ अहिल्यानगर दिनांक २१/०८/२०२६

प्रति.
श्री. अभिजीत नरसय्या सादुल.
रा.नालेगाव. हडको. ता. जि.अहिल्यानगर } ....अर्जदार

विरुध्द

अधिकारी. जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
अहिल्यानगर महानगरपालिका ता.जि.अहिल्यानगर } ....सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्री.अभिजीत नरसय्या सादुल. यांनी सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री.अभिजीत नरसय्या सादुल. यांची मुलगी नामे रेयांशी अभिजीत सादुल हिचा जन्म दि.३०/०६/२०२२ रोजी डौले हॉस्पीटल. सावेडी. ता.जि.अहिल्यानगर येथे झालेला आहे. तिची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, अर्जदार श्री.अभिजीत नरसय्या सादुल, यांची मुलगी नामे रेयांशी अभिजीत सादुल हिचा जन्म दि.३०/०६/२०२२ रोजी डौले हॉस्पीटल. सावेडी, ता.जि.अहिल्यानगर येथे जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिथ्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिल्ली असे.

**(स्वप्निल ढवळे)**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

---

# दुरुस्ती

दि. ०१/०९/२०२६ रोजीच्या दैनिकामध्ये सर्वज्ञ मल्टी स्टेट को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या जाहिरातीमध्ये इच्छुक व पात्र उमेदवारांनी अर्ज जमा करण्याची तारीख १३/११/२०२५ झाली असुन ती तारीख ०८/०९/२०२६ अशी वाचावी.

शाखाधिकारी
सर्वज्ञ मल्टी स्टेट को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
फोन. (०२४१) २३२८२२२

---

मरणोत्तर नेत्रदानाची वाट, अंध जीवनाची चैतन्यमय पहाट...



"मरणोत्तर नेत्रदान करुया, दोन अंधांचे अंधःकारमय जीवन प्रकाशमान करुया.."

स्व.श्री. श्रीधर काशिनाथ डांगे

डांगे परिवाराच्या योगदानाबद्दल शतशः ऋणी आहोत.

डॉ. कांकरियांचे

साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा

मान कन्हैया नेत्रपेढी

वर्धमान, माणिकचौक, अहिल्यानगर 414001
संपर्क मोबा.: 8888982222 / 9112288611

Nirmal

---

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे चाहुराणा बु. येथील लोकांना कळविण्यात येते की, सर्व्हे नं. १३२/६ चे क्षेत्र ० हे २० आर व पो. ख. ० हे ०१ आर ही मिळकत श्री अतुल अशोक पारख व श्री. सचिन विजयराव बारस्कर यांनी खरेदी केलेली आहे. सदर खरेदीखत करतेवेळेस मिळकत विकसित करण्यासंदर्भात व उच्च न्यायालयातील प्रकरणाबाबत तडजोड करणे इ. बाबींबाबत सदर खरेदीदार व आमचे अशिलांबरोबर चर्चा होऊन लेखी करारनामा झालेला आहे. सदर करारनाम्यानुसार प्रस्तुत मिळकती संदर्भात आमच्या आशिलास फार मोठी रक्कम येणे बाकी आहे. सदर रकमेबाबत आमचे अशिलाने स्वतंत्र नोटीस देखील पाठवलेली आहे. परंतु श्री. अतुल पारख व श्री. सचिन बारस्कर हे मिळकतीचे खरेदीखतान्वये सदर मिळकत तिऱ्हाईत इसमास विक्री करु पाहत आहेत तशा जोरदार हालचाली सुरु केलेल्या आहेत. सदर रकमे संदर्भात प्रस्तुत मिळकती वरुनच वाद उपस्थित झालेला आहे, त्यामुळे सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारे खरेदी विक्री गहाण, दान, बक्षीस, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये. सदर व्यवहार करण्याऱ्यास प्रस्तुत मिळकतीचा मालकी हक्क व ताबा प्राप्त होणार नाही. त्यामुळे कोणाचीही फसगत होऊ नये याकरीता प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द केली असे.

तारीख: ०२/०९/२०२६, अहिल्यानगर

**अॅड. सौरभ सुभाष काकडे** (एल.एल.एम)
३८७६, काकडे सदन, नांगरे गल्ली अहमदनगर फोन नं. ९४२२३३३३३९

---

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीन्वये कळविण्यात येते की, शहर अहिल्यानगर येथील सिटी सर्व्हे नं.५४१९ चा म्यु.नं. ४१०८ चे एकूण क्षेत्र ४४.३० चौ. मी. ही मिळकत **१)राजेंद्र रामचंद्र देशमुख, २)शशिकांत रामचंद्र देशमुख ३) किशोर रामचंद्र देशमुख सर्व रा.अहिल्यानगर** यांचे मालकी कब्जेवहिवाटीस आहे. ती मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याबाबत ठराव केलेला आहे. त्या मिळकतीवर लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या. बागडपट्टी अहिल्यानगर या पतसंस्थेचा कर्जाचा बोजा असून तशी मिळकत पत्रिकेवर नोंद आहे. त्याव्यतिरिक्त सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारचा बोजा नाही. असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. ठरावाप्रमाणे आमचे अशिल वरील मिळकतीचे खरेदीखत करून घेणार आहेत. तथापि सदर मिळकतीवर कोणाचीही गहाण, दान, बक्षीसपत्र, अन्नवस्त्र बोजा, चालू वाद, कोर्टजप्ती भाऊहिस्सा, बँक, पतसंस्था कर्जाचा बोजा असल्यास व सदर मिळकत विक्री करण्याबाबत कोणाचीही कायदेशीर हरकत अगर तक्रार असल्यास संबंधीतांनी आपल्या सर्व हरकती व तक्रारी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खाली सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारच्या हरकती अगर तक्रारी प्राप्त न झाल्यास वर नमुद केलेली मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे व संबंधीतांनी सदर मिळकतीमधील त्यांचे हक्क, अधिकार व तक्रारी वगैरे जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे, ता. २/०९/२०२६

**अॅड. दिपक बी. जेटला**
**अॅड. प्रमोद एच. जेटला**
ऑफिस नं. ५ अक्षदा कॉम्पलेक्स, गुजर गल्ली, अहिल्यानगर

---

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार रियाज अहमद मेहमुद शेख यांनी दिलेल्या माहिती वरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन कळविण्यात येते की, आमचे पक्षकार रियाज अहमद मेहमुद शेख व त्यांचे मयत बंधु इकबाल अहमद मेहमुद शेख यांची फेब्रुवारी १९८९ साली बॉम्बे नर्सिंग होम अॅण्ड पॉलिक्लिनीक नावाची भागीदारी संस्था असून ती आजपावेतो कार्यरत आहे. सदर संस्थेचे नावे गट नं. ३२१/२ प्लॉट नं. ४ व गट नं. ३२१/२ प्लॉट नं. ९ मुकूंदनगर मौजे भिंगार, ता. जि. अहमदनगर या २ मिळकती असून त्या बॉम्बे नर्सींग होम अॅण्ड पॉलीक्लीनीक भागीदारी या संस्थेच्या नावावर आहे. सदर मिळकती या संस्थेच्या मालकी हक्क व वहिवाटीच्या आहेत. सदर फर्म ही डॉ. रियाज शेख यांच्या आजतागायत प्रत्यक्ष कब्जात असून ते कामकाज पाहत आहेत.

संस्थेचे भागीदार श्री. इकबाल अहमद मेहमुद शेख यांचे दि. ३०/०५/२०२१ रोजी निधन झाले आहे. त्यांचे वारस १) आकिब इकबाल शेख व इतर यांनी भिंगार तलाठी कार्यालयात खोटे, चुकीचे व दिशाभुल करणारे अर्ज देऊन आमचे पक्षकार बॉम्बे नर्सींग होम व पॉलीक्लिनीक फर्मचे नाव वगळून १) ताहिरा इकबाल अहमद शेख २)आकिब इकबाल शेख ३) आयेशा शोहेब पठाण यांची नावे लावून घेतली आहेत. वास्तविक पाहता तलाठी कार्यालय भिंगार किंवा मंडल अधिकारी भिंगार यांनी आमचे पक्षकार यांना कोणत्याही प्रकारची लेखी माहिती व त्याबाबत काहीही न कळविता चुकीची, बेकायदेशीर व अन्यायकारक नोंद केलेली आहे. याबाबत आमचे पक्षकार यांनी अहमदनगर येथील उपविभागीय अधिकारी साहेब यांचेकडे फर्स्ट आर. टी एस अपिल नं ,२७०/२०२२ दाखल केले होते त्याचा निकाल झाला असुन सर निकाल आमचे अशिल रियाज अहमद मेहमुद शेख यांचे बाजुने झाला आहे. तसेच या बाबत पुढील कारवाईसाठी अप्पर तहसीलदार यांचेकडे दाखल आहे व योग्य ती कारवाई चालु आहे.

तसेच यामध्ये उल्लेख मिळकतीबाबत इतर न्यायालयीन कारवाई चालु आहे. या नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, आकिब इकबाल शेख व इतर दोन व्यक्ती सदर मिळकती विकण्याच्या प्रयत्नात आहेत. तरी अशाप्रकारे कोणीही या मिळकतींबाबत कोणताही करार, मदार, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, खरेदी व इतर कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. तसेच सदर फर्मचे मयत भागीदार श्री. इकबाल अहमद मेहमुद शेख हयात असताना फर्मच्या विरूध्द Debit Recovery Tribunal Aurangabad येथे दावा दाखल केला असून तो न्याय प्रविष्ठ आहे. अश्या परिस्थितीत सदर मिळकतीबाबत केलेला कोणत्याही प्रकारचा व्यवहार आमचे पक्षकार यांचेवर ते बंधनकारक राहणार नाही व बेकायदेशीर राहिल केवळ कुणाची फसगत होऊ नये म्हणुन ही जाहिर नोटीस दिले असे.

**मिळकतीचे वर्णन**

गाव भिंगार, ता. नगर, जि.अहमदनगर मुकूंदनगर विभाग गट नं.३२१/२ प्लॉट नं.४ व गट नं.३२१/२ प्लॉट नं,९ याचे क्षेत्र २.४४.१२ व २.५९.६२ चौ.मी. बॉम्बे नर्सींग होम अॅण्ड पॉलीक्लिनिक या भागीदारी संस्थेची असलेली मिळकत.

दिनांक :-०२/०९/२०२६

**अॅड. राजेश एम. कोठारी** (एलएल.बी)
'अभिजीत' मुनोत इस्टेट, स्टेशन रोड, अहमदनगर मो. ९४२२२२१५७५

---

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

अहिल्यानगर महानगरपालिका २००३ निरंतर नगरसेवा

## कोटेशन नोटीस

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या **राजमाता जिजाऊ शहाजी राजे भोसले मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे** खालीलप्रमाणे काम GST नंबर असणारे यांचेकडून खालील काम करून घ्यावयाचे आहे. कामाचा तपशील खाली दिलेला आहे. सदर कामाचे कोटेशन आपले लेटरहेडवर **दि. २/९/२०२६ ते दि. ७/९/२०२६** तारखेपर्यंत वैद्यकीय आरोग्य विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका यांचेकडेस कार्यालयीन वेळेत जमा करावीत. सदर कामाची सिलबंद कोटेशन **दि.७/९/२०२६** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत कै. बा. दे. दवाखाना व सुतिका गृह, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे कार्यालयात दाखल करावीत. कोणतेही अगर सर्व कोटेशन नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

राजमाता जिजाऊ शहाजी राजे भोसले मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील **MGPS, MOT** वैद्यकीय उपकरणे रुग्णवाहिका व इतर सेवांसाठी अंदाजित खर्च

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | क्षेत्रफळ | प्रमाण | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| A-1 | मेडिकल गॅस पाइपलाईन प्रणालीचे काम | लागु नाही | १ संच | |
| १ | ICU | | | |
| २ | NICU | | | |
| ३ | OT | | | |
| ४ | कॅज्युअल्टी | | | |
| ५ | रिकव्हरी | | | |
| ६ | इतर वॉर्ड | | | |
| A-2 | मॉड्युलर ऑपरेशन थिएटर | | | |
| 1 | MOT | 368 SQFT | १ नग | |
| 2 | सेमी MOT | 780 SQFT | ३ नग | |
| A-3 | व्हिनाइल फ्लोअरिंग व सेल्फ लेव्हलिंग (ICU, रिकव्हरी, कॅज्युअल्टी, OT, NICU) | 5380 SQFT | १ संच | |
| A-4 | ॲल्युमिनियम कर्टन ट्रॅक प्रणाली, (ICU, रिकव्हरी, कॅज्युअल्टी, OPD सेमी स्पेशल रुम) | | १ संच | |
| B-1 | वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा | | | |
| 1 | सर्व विशेष विभागांसाठी (मेडिसिन, ऑर्थो, गायनेक, लॅब, OT, NICU इ.) यादी संलग्न आहे. | | १ संच | |
| B-2 | वैद्यकीय साधणसामग्रीचा पुरवठा | | १ संच | |
| C | रुग्णवाहिकेचा पुरवठा | | | |
| 1 | BLS (बेसिक लाइफ सपोर्ट)- ऑक्सिजन सिलिंडर ठेवण्याची व्यवस्था, विद्युत पॉवर पॉइंटस् सक्शन मशीन, AED यांची तरतुद, तांत्रिक तपशीलानुसार | | १ संच | |
| | एकुण | | | |

टिप : कामाबाबत सविस्तर माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) कै. बा. दे. दवाखाना येथे पाहण्यास मिळेल.

जा. न.प्रसिद्धी ३२१
दि. ०१/०९/२०२६

**उपायुक्त (आरोग्य), अहिल्यानगर महानगरपालिका**

---

Career Ki Shuruwat **DiSHA** ke saath

**Get Any Course Just in 2700/-**

MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR , IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.

An ISO 9001:2015 Certified
**DiSHA COMPUTER INSTITUTE**

**दिल्ली गेट शाखा**
आनंद केशव हाइट्स, सुयेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
**9371051769**

**जुने बस स्टँड शाखा**
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी, अ.नगर.
**9371151769**

**पाईपलाईन शाखा**
रुणा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
**7447761769**

---

# दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग

**9403232323**